# प्रकरण पाचवे

# रामदास आठवले आणि बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाचा विशेष अभ्यास

## ५.१ प्रस्तावना :

महाराष्ट्रातील दलित राजकीय नेतृत्व : "रामदास आठवले आणि बाळासाहेब आंबेडकर यांचा विशेष अभ्यास." या विषयाचे अध्ययन करतांना रामदास आठवले आणि बाळासाहेब आंबेडकर या दोन दलित राजकीय नेतृत्वाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय कार्याचा आढावा घेण्यात आला आहे. त्यांच्या या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय कार्याचा विशेष अभ्यास करण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या राजकारणातील एक महत्त्वपूर्ण नेतृत्व रामदास आठवले आणि बाळासाहेब आंबेडकर यांचे आहे. सिध्दार्थ विहार वसतिगृह येथून रामदास आठवले यांच्या नेतृत्वाची जडण - घडण झाली. सिध्दार्थ विहार हे तत्कालीन दलित चळवळीचे प्रमुख केंद्र होते. याच वसतिगृहातून अनेक कार्यक्रमांची आंदोलनांची रणनिती ठरवण्यात आली होती. सिध्दार्थ विहार वसतिगृहाच्या माध्यमातून रामदास आठवले यांचा दलित चळवळीशी संबंध आला. या ठिकाणाहूनच ते दलित पँथरमध्ये सक्रिय सहभागी झाले. राजा ढाले, नामदेव ढसाळ, अरुण कांबळे यांच्या सानिध्यात राहून दलित पँथरच्या विविध आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला. रामदास आठवले हे महाराष्ट्राच्या दलित राजकारणातील एक महत्त्वाचे नेतृत्व आहे. रामदास आठवले गेली २० वर्ष महाराष्ट्राच्या राजकारणात आहेत. दलित पँथरच्या विभाजनानंतर दलित पँथर बरखास्त केली जाणार नाही, अशी घोषणा करून प्रा. अरुण कांबळे, रामदास आठवले आणि त्यांच्या अन्य सहकाऱ्यांनी भारतीय दलित पँथरची स्थापना केली. दलित पँथरच्या विभाजनाचा नेमका फायदा घेत रामदास आठवले यांनी भारतीय दलित पँथरच्या माध्यमातून विद्यापीठ

नामांतर आंदोलनाचा लढा दिला. औरंगाबाद विद्यापीठ नामांतर आंदोलनाच्या माध्यमातून रामदास आठवले यांचे नेतृत्व प्रकाश झोतात आले.

रिपब्लीकन पक्षाच्या जेष्ठ नेत्यांना दलित तरुणाई कंटाळली होती. याचा नेमका फायदा रामदास आठवले यांना झाला. महाराष्ट्रातील संपूर्ण दलित तरुण रामदास आठवले यांच्या बाजुने उभा राहिला. रामदास आठवले यांनी दलित पँथरच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या समाजकारणात आणि राजकारणात आपला प्रभाव निर्माण केला. स्वकर्तृत्वावर त्यांनी सामाजिक व राजकीय क्षेत्रात एक वेगळे वलय निर्माण केले, परंतु ते कधी स्वयंभू नेते झाले नाहीत. कारण कोणाच्या तरी आधारानेच त्यांचे नेतृत्व विकसित होत गेले. प्रारंभी १९९० च्या दशकात शरद पवारांच्या मदतीने रामदास आठवले यांचे राजकारण आकार घेऊ लागले. रामदास आठवले यांच्या नेतृत्वाबाबत पत्रकार प्रकाश अकोलकर लिहितात, "रामदास आठवले यांचं वागणं - बोलणं, राहणं - फिरणं, कपडे घालणं सारच प्रस्थापित राजकारण्यापेक्षा तो कसा वेगळ्याच रस्त्यानं जाणारा आहे. त्याची साक्ष देणारे आहे. त्यांचे रंगी बेरंगी शर्ट आणि जाकिट, त्यांचे ते झोकदार बुट सारच कसं प्रस्थापित राजकारण्यांशी तो कसा फटकून वागतो. तेच दाखवणारे असतात. तो फार मोठा वक्ता नाही आणि विचारवंत तर नाहीच नाही. खरं तर तो आपला जमिनीवर उभा राहणारा सच्चा कार्यकर्ता आहे. गावा-गावातल्या कार्यकर्त्यांशी त्यांचा जनसंपर्क असतो आणि ग्रासरुट लेव्हलला नेमकं काय चाललय, त्याचं त्याला नेमकं भान असतं. गावागावातल्या कोणत्याही सभा समारंभात तो अगदी मनापासून सहभागी होत असतो आणि तिथं जुन्या ओळखी पाळखीनां उजाळा देण्याबरोबर नवी नाती जोडण्याचं कामही तो तितक्याच जिव्हाळ्यानं करत असतो. या एका बाबतीत त्यांची तुलना थेट शरद पवाराशीच होऊ शकते आणि कदाचित त्यामुळेच गेली दोन दशकं त्यांचा पवार साहेबांशी चांगला दोस्ताना होता."[१] रामदास आठवले यांच्या नेतृत्वाचे प्रकाश अकोलकर यांनी विश्लेषण करतांना त्यांच्या बलस्थानाचा

आणि उणिवांचा आढावा घेतलेला आहे. कोणत्याही नेतृत्वामध्ये बलस्थानं आणि उणिवा असतात. रामदास आठवले यांच्या नेतृत्वातील जमेची बाजू म्हणजे त्यांचा महाराष्ट्रातील खेड्यापाड्यातील जनतेशी जनसंपर्क हा मोठा आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात ज्या ज्या ठिकाणी दलितांवर अन्याय अत्याचार होतात तेव्हा रामदास आठवले हे सर्व प्रथम धावून जाणारा पँथर आहे. म्हणूनच त्यांच्या बाबतीत Fearless Panther of India ही उपमा योग्य वाटते.

**५.२ रामदास आठवले यांच्या नेतृत्वातील रिपब्लीकनपक्षाची संघटनात्मक बांधणी :**

रामदास आठवले यांच्या नेतृत्वातील रिपब्लीकन पक्षाच्या संघटनात्मक बांधणीचा अभ्यास करण्यात आला. "रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अधिवेशन २६-२७ डिसेंबर १९९८ रोजी पुणे येथे झाले. या अधिवेशनात आठवले यांची पक्षाच्या अध्यक्षपदी निवड झाली."[२] रामदास आठवले यांची पहिल्यांदा रिपब्लीकन पक्षाच्या अध्यक्षपदी निवड झाली होती. अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर रामदास आठवले यांनी अध्यक्षीय भाषणात आपल्या पक्षाची भूमिका विशद केली. राजकीय नेतृत्वाला प्रभावी बनवण्यासाठी नेतृत्वाची संघटनात्मक बांधणी महत्त्वाची भूमिका पार पाडते. ज्या नेतृत्वाची संघटनात्मक बांधणी मजबूत असते. त्या नेतृत्वाचा व्यापक असा प्रभाव असतो. रामदास आठवले यांनी आपल्या पक्षाच्या गावपातळीपर्यंत संघटना निर्माण केल्या आहेत. माणसे एकत्र आले की, गट तयार होतात. वेगवेगळे गट एकत्र आले की, संघटना तयार होते ही संघटना समाजाची दिशा बदलू शकते.

संघटनेचे महत्त्व विशद करतांना यशवंत मनोहर म्हणतात, "पुस्तकाचे एकेक पान सुटे असले तर वाऱ्याच्या लहानशा झुळूकीनेही उडून जाते. त्याची दुर्दशा होते, पण सगळी पाने एकत्र करून त्यांची छान बांधणी केली की, ग्रंथ तयार होतो. ग्रंथ वजनदार होतो. तो वाऱ्याने उडून जात नाही, सुटी पाने एकत्र बांधले जाण्याची प्रक्रिया त्यांनी मान्य केली की, त्यांच्यात शक्ती तयार होते. त्यांचे वजन वाढते. तसेच माणसांचे

आहे. क्रांती विरोधीशक्ती एकेका माणसांचे अपहरण करते, पण हीच माणसे एकत्र आली की महासंघटना साकारते. या संघटनेचे अपहरण करण्यात क्रांती विरोधी शक्तींना हतबलता येते."[३]

पक्षाची संघटनात्मक बांधणी मजबूत असेल तरच पक्ष आणि पक्ष नेतृत्व प्रभावी असतो. रामदास आठवले यांनी पक्षाचे नेते म्हणून गावपातळीपर्यंत पक्षाच्या संघटना निर्माण केल्या. रामदास आठवले यांच्या नेतृत्वातील रिपब्लीकन पक्षाच्या संघटनेत लढाऊ कार्यकर्त्याचे प्रमाण अधिक आहे. पक्ष संघटनेत कार्यकर्त्यांचे महत्त्व विशद करतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, "You must be able to create dovoted workers" डॉ. बाबासाहेबांच्या विधानानुसार कार्यकर्ता हा निष्ठावाण प्रामाणिक, त्यागी असावा समाज परिवर्तनासाठी नेता आणि कार्यकर्ता या दोन बाबींची प्रामुख्याने आवश्यकता असते. नेता म्हणजे विचारशक्ती तर समाजाच्या कानाकोपऱ्यात विचार पोहचवणारा कार्यकर्ता असतो. समाज परिवर्तनाच्या चळवळीत कार्यकर्त्यांचे महत्त्व अधोरेखित करतांना डॉ. यशवंत मनोहर म्हणतात, "समाज परिवर्तनाच्या चळवळीला दोन प्राण असतात. चळवळीचा एक प्राण असतो विचार दुसरा प्राण असतो. कार्यकर्ता समाजाला विचाराप्रमाणे कृती करण्यास चेतवणारा आणि विचारानुसार समाजाला जगण्याचे प्रशिक्षण देणारा कार्यकर्ता नेता आणि कार्यकर्ता हे चळवळीचे दोन प्राण असतात. वरील दोन्ही पैकी कोणताही एक प्राण नसला किंवा असूनही दुबळा असला तर चळवळ अगतिक होऊन जाते."[४]

समाज परिवर्तनाच्या अनुषंगाने निर्माण करण्यात आलेल्या राजकीय पक्षाच्या संघटनेत कार्यकर्ता हा विचाराचा वाहक आहे. चळवळीचा विचार निरंतरपणे समाजातील सामान्य माणसांपर्यंत पोहचवण्याचे काम करतो. कार्यकर्ता हा प्रमाणिक, त्यागी, निष्ठावाण, याबरोबरच तो प्रशिक्षित असावा. रामदास आठवले यांच्या रिपब्लीकन पक्षामध्ये लढाऊ कार्यकर्त्यांचा भरणा अधिक आहे, परंतु त्यांच्या पक्षात प्रशिक्षित

कार्यकर्त्यांचा अभाव दिसून येतो. कार्यकर्ता हा जन्माला येत नाही. त्याला घडवावे लागते. कार्यकर्ता घडवण्याचे काम प्रशिक्षणाच्या माध्यमातून करता येते. कार्यकर्ता ही पक्षाची प्रमुख शक्ती आहे. ही शक्ती प्रयत्नपूर्वक घडवली पाहिजे. पक्षातील कार्यकर्त्याला समाज, अर्थकारण शिक्षण, राजकारण या क्षेत्रातील समस्या आणि विश्लेषण त्यावर मात कशी करावी याचे प्रशिक्षण कार्यकत्याला द्यावे. ध्येयाने आणि विचाराने झपाटलेल्या कार्यकर्त्यांची फळी निर्माण केल्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असणारी शासनकर्त्या जमातीचे स्वप्न साध्य करता येईल. रामदास आठवले यांच्या नेतृत्वातील रिपब्लीकन पक्षात लढाऊ कार्यकर्त्यांचा भरणा अधिक आहे, परंतु त्या लढावू कार्यकर्त्याला अधिकाधिक प्रशिक्षित करणे गरजेचे आहे. पक्षीय संघटन मजबुत करण्याची आवश्यकता आहे.

रामदास आठवले यांची दलित पँथरच्या माध्यमातून वैचारिक बैठक निर्माण झाली. रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखालील रिपब्लिकन पक्षाची विचारधारा प्रामुख्याने स्वतंत्र मजूर पक्ष आणि शेड्युल्ड कास्ट फेडरेशन या पक्षाच्या विचारांशी सुसंगत दिसून येते. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय यावर आधारित समताधिष्ठीत समाजाची निर्मिती करणे आणि जातिविहिन समाज संसदीय लोकशाही, धर्मनिरपेक्षता हा राजकीय कार्यक्रम आहे. रामदास आठवले यांनी २००९ ला शिर्डी लोकसभा मतदार संघातून काँग्रेस बरोबर युती करून निवडणूक लढवली. या निवडणुकीत रामदास आठवले यांचा पराभव झाला. आपल्या पराभवानंतर रामदास आठवले यांनी शिवसेनेशी युती केली.

"काँग्रेस-राष्ट्रवादीशी फारकत घेऊन रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखालील रिपब्लिकन पक्षाने शिवसेना - भाजपशी युती करण्याचा निर्णय घेतला. शिवशक्ती - भीमशक्तीच्या नावाने उदयास आलेल्या नव्या राजकीय आघाडीने अन्य पक्षात खळबळ उडाली. राजकीय व सामाजिक विचारात टोकाचे मतभेद असलेले शिवसेना व रिपब्लीकन पक्षाचे एकत्र येणे हा सर्वांना धक्काच होता. हा नवा घरोबा आंबेडकरी जनतेच्या गळी

कसा उतरावयाचा हे आरपीआय समोर आव्हान आहे."[५] वैचारिकदृष्ट्या परस्परविरोधी असलेल्या पक्षांची राजकीय युती झाली. शिवसेनेचा कडवा हिंदुत्ववाद आणि आरपीआयचा धर्मनिरपेक्ष विचार या राजकीय हितसंबंधात, निवडणुकीत दोघांचेही राजकीय विचार अडसर ठरणार नाहीत यासाठी दोन्ही नेतृत्वानी वैचारिक तडजोडीची भूमिका स्वीकारली. "१७ जून २०११ ला रामदास आठवले यांच्या आरपीआयने लोणावळा या ठिकाणी पक्षाच्या बैठकीचे आयोजन केले. नामदेव ढसाळ यांच्या अध्यक्षतेखाली रिपब्लीकन पक्षाचा राजकीय कार्यक्रम ठरवण्यासाठी एक मसुदा समिती स्थापन करण्यात आली. या समितीने आपला एक राजकीय अजेंडा तयार केला. ही युती स्थानिक स्वराज्य संस्थापुरती मर्यादित न राहता पुढे लोकसभा व विधानसभा निवडणुकापर्यंत राहावी. शिवसेना भाजपचे कडवे हिंदूत्व रिपब्लीकन पक्षाला अडचणीचे ठरणार आहे. त्यामुळे सर्वधर्म समभावाचा विचार स्वीकारला जावा. सवर्णातील सर्व जातींना लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण दिले जावे असे ठरवण्यात आले होते.

**५.२.१ रामदास आठवले यांचा राजकीय आणि आर्थिक कार्यक्रम :**

कोणत्याही राजकीय नेतृत्वाला विकसित करण्यासाठी त्या राजकीय नेतृत्वाकडे निश्चित कसा राजकीय आणि आर्थिक कार्यक्रम असावा लागतो. राजकीय नेतृत्व ज्या समाजाचे किंवा समुदायाचे नेतृत्व करते त्या नेतृत्वास त्या समाजाचे किंवा समुदायाचे सामाजिक, आर्थिक राजकीय शैक्षणिक धार्मिक प्रश्नांची उत्तम जाण आणि अभ्यास असावा. समाजातील समस्यांची जाणीव ठेवून त्या सोडवण्यासाठी निश्चित असा राजकीय आणि आर्थिक कार्यक्रम निश्चित करावा लागतो. राजकीय आणि आर्थिक कार्यक्रमाच्या आधारे समाजपरिवर्तन साधता येते. जे नेतृत्व समाजातील समस्या सोडवून समाजाला प्रगतीच्या दिशेने घेऊन जाते तेच खरे नेतृत्व असते.

राजकीय कार्यक्रमाच्या आधारे नेतृत्व समाजातील जनतेला संघटित करून समाजास दिशा दर्शन करण्याचे काम करते.म्हणून राजकीय व्यवस्थेतील प्रत्येक

राजकीय नेतृत्वाकडे राजकीय कार्यक्रम असतो. त्या राजकीय कार्यक्रमाच्या आधारे नेतृत्व संघटनात्मक बांधणी करून नेतृत्व विकसित करते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राजकीय सत्तेचे महत्त्व लक्षात घेऊन विस्थापित, वंचित , उपेक्षित, दलित समाजाला राजकीय सत्तेचे महत्त्व पटवून करून विखूरलेल्या समाजाला राजकीय दृष्ट्या संघटित करण्यासाठी बहिष्कृत हितकरणी सभा, स्वतंत्र मजूर पक्ष, शेड्युल्ड कास्ट फेडरेशन, रिपब्लीकन पक्षाची स्थापना केली. राजकीय पक्ष स्थापन करण्यापाठीमागे बहिष्कृत,दलित, शेतकरी, कामगार, मजूर वर्गाला संघटित करून त्यांच्यात सामाजिक आणि राजकीय जाणीव जागृती निर्माण करते आणि स्वातंत्र्य, समता,बंधुता,न्यायावर आधारित समताधिष्ठीत समाज निर्माण करणे हा होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जातिविहीन समाजाचा विचार प्रतिपादित केला. रामदास आठवले यांच्या नेतृत्वाची जडण घडण दलित पँथरच्या माध्यमातून झाली.जातीविहीन आणि समताधिष्ठीत समाज निर्माण करणे आणि दलितांवरील अन्याय अत्याचार शोषणाविरुध्दचा आवाज म्हणजे दलित पँथर होती. खासगी क्षेत्रात मागासवर्गीयांना आरक्षण द्यावे. सत्तेच्या सर्व क्षेत्रात २० टक्के सत्तेचा वाटा मिळावा. हा विचार घेवून पँथर काम करीत होता."[६] रामदास आठवले यांनी काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षाशी राजकीय फारकत घेतल्यानंतर त्यांच्या पक्षाने परस्पराविरोधी असलेला शिवसेना भाजपा यांच्याशी आघाडी केली. शिवसेना भाजपाचा कडवा हिंदुत्ववाद रिपब्लीकन पक्षासाठी अडसर ठरणारा होता.म्हणून दोन्ही पक्षासोबत राजकीय हितसंबंध जोपासण्यासाठी आरपीआयने आपला राजकीय अजेंडा तयार केला. शिवसेना भाजपाच्या कडव्या हिंदुत्वाला सर्वधर्मसमभावाचा पर्याय रामदास आठवले यांनी देण्याचा प्रयत्न केला. प्रारंभी शिवसेना आणि नंतरच्या महायुतीतून रामदास आठवले यांनी आपला जो स्वतंत्र राजकीय कार्यक्रम आखला.या राजकीय कार्यक्रमाच्या आधारे रामदास आठवले यांच्या नेतृत्वाला अपेक्षित राजकीय यश प्राप्त झाले नाही. हे मुंबई महानगरपालिका, लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीतील

निकालावरुन स्पष्ट होते. कोणत्याही पक्षातील नेतृत्वाचा एक स्वतंत्र राजकीय कार्यक्रम असतो, या राजकीय कार्यक्रमाच्या आधारे जनतेसमोर जाता येते. या राजकीय कार्यक्रमावर नेतृत्वाचे निवडणूकीच्या राजकारणातील भवितव्य अवलंबून असते.

राजकीय नेतृत्वाकडे राजकीय कार्यक्रमाबरोबर आर्थिक कार्यक्रम असावा लागतो. राजकीय कार्यक्रमाच्या आधारे नेतृत्व जनमत संघटित करीत असते तर आर्थिक कार्यक्रमाच्या आधारे ज्या समुदायातून नेतृत्व आले आहे. त्या समुदायातून आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवून चळवळ गतिमान करता येते. राज्याचा आणि राजकीय नेतृत्वाचा मुख्य उद्देश हा जनतेला चांगले जीवन प्रदान करणे हा असतो. जनतेच्या मुलभूत समस्या सोडवण्यासाठी त्यांना चांगले जीवन जगता यावे यासाठी नेतृत्वाकडे प्रभावी असा आर्थिक कार्यक्रम असावा लागतो. आर्थिक कार्यक्रमाच्या आधारे दलितांच्या सामाजिक आर्थिक, शैक्षणिक समस्या सोडवता येतील. रामदास आठवले यांनी दलित चळवळीचे नेतृत्व करीत असतांना गरिबी निर्मूलन, सहकार तत्वावर बँका, पतपेढ्या निर्माण करणे आवश्यक आहे.

सहकार तत्वावर शेती करणे, मागासवर्गीयांचा अनुशेष भरुन काढणे, अ. जातीच्या मुलांचा शैक्षणिक शुल्काचा प्रश्न सोडवणे, खाजगी क्षेत्रात अ. जातींना आरक्षणाची व्यवस्था करणे इत्यादी आर्थिक कार्यक्रम रामदास आठवले यांनी ठरविला आहे. राजकीय चळवळीस आर्थिक कार्यक्रमाची जोड असणे अनिवार्य असते. राजकीय सत्तेच्या माध्यमातून आर्थिक कार्यक्रमाला राबवता येतो. "रामदास आठवले गायरान जमिनीच्या बाबत अग्रेसर राहिल्याने हा प्रश्न सोडवण्यासाठी संधी येताच त्यांनी मंत्रिमंडळात पाठपुरावा करून यश मिळवले. हजारो एकर गायरान जमिनीचे पट्टे त्यांच्यामुळेच कसणाऱ्यांच्या नावे गायरान करण्याची प्रक्रिया राज्यात गतिमान झाली. १४ एप्रिल १९९० पर्यंतची अतिक्रमणे नियमित करण्याचा निर्णय शासनाने घेतला."[७]

रामदास आठवले हे महाराष्ट्राचे समाजकल्याणमंत्री असतांना महाराष्ट्रातील

गायरान जमिनी कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या नावे केली. राजकीय नेतृत्वाला आपल्या राजकीय आणि आर्थिक कार्यक्रमाची अंमलबजावणी सत्तेच्या माध्यमातून करता येते. रामदास आठवले यांना सत्तेत संधी मिळताच सामान्य शेतकऱ्यांना त्यांच्या नावे गायरान जमिनीची पट्टे केली. मागासवर्गीयांच्या राखीव जागांचा अनुशेष भरुन काढण्याचा प्रयत्न केला. "राखीव जागाचा अनुशेष न भरणाऱ्या सहकारी बँका सहकारी कारखाने, राज्य सरकारच्या अखत्यारितील महामंडळे, विद्यापीठे, शैक्षणिक संस्था यांच्यावर कठोर कारवाई करण्याची तरतूद या आदेशात आहे. हा आदेश १९९४ मध्ये काढण्यात आला."[८] मागासवर्गीयांचे घटनात्मक आरक्षण असतांना सुध्दा शासनाच्या उदासिनतेतून अनुशेष निर्माण झाला होता. तो अनुशेष भरण्यासाठी रामदास आठवले यांनी गांभिर्यपूर्वक लक्ष घालून राखीव जागांचा अनुशेष भरला.

रामदास आठवले यांची वामन निबांळकर यांनी मुलाखत घेतली. या मुलाखतीत वामन निंबाळकर यांनी रामदास आठवले यांना आर्थिक कायद्याविषयी प्रश्न विचारला होता. त्या प्रश्नाचे उत्तर देतांना रामदास आठवले म्हणाले, " सहकार तत्वावर छोटे मोठे कारखाने उभे करून बेरोजगारीचा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न आहे. प्रत्येक शहरामध्ये सहकारी तत्वावर डिपार्टमेंटल स्टोअर्स उभी करण्याचा एक संकल्प आहे. त्यामध्ये त्या त्या शहरातील दलित मागासवर्गीयांचे शेअर्स घेऊन त्यांचे नावे त्या स्टोअर्सशी जोडून त्यांच्या आर्थिक विकासाचा प्रयत्न करावयाचा आहे. सहकारी तत्वावर शेतीचा विकास करावयाचा आहे व जिल्हा तालुका स्तरावर सहकारी बँकांची स्थापना करण्याचा प्रयत्न केला जाईल."[९]

रामदास आठवले यांनी आर्थिक कार्यक्रमाची आखणी आंबेडकरी चळवळीला गतीमान करणारी आहे, पण या डिपार्टमेंटल स्टोअर्सला, सहकारी शेतीचा, सहकारी बँकांची स्थापना प्रत्यक्षात झाली नाही. रामदास आठवले यांचा आर्थिक कार्यक्रम प्रत्यक्षात राबवला असता तर दलितांचा आर्थिक विकास होऊन दलित समाज आर्थिकदृष्ट्या

स्वावलंबी बनला असता. रामदास आठवले यांनी शिवसेना - भाजप सोबत युती केली. युती केल्यानंतर त्यांनी नामदेव ढसाळ यांच्या नेतृत्वाखाली एक समिती स्थापन केली. या समितीच्या माध्यमातून स्वतंत्र असा राजकीय आणि आर्थिक कार्यक्रम तयार केला. आर्थिक कार्यक्रमात खाजगी क्षेत्रात मागासवर्गीयांना आरक्षण देण्यात यावे अशी तरतूद आहे. खाजगी क्षेत्रात मागासवर्गीयांना आरक्षण देण्यात यावे यासाठी रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली घटनात्मक मार्गाचा अवलंब करून प्रयत्न करण्यात आला. त्यांच्या प्रयत्नाला अपेक्षित यश आले नाही. घटनात्मक सामाजिक शैक्षणिक आरक्षण सुरक्षित ठेवून खाजगी क्षेत्रात आरक्षणासाठी व्यापक लढा उभारावा लागणार आहे. नव्या भांडवली अर्थव्यवस्थेत जागतिकीकरणाच्या युगात शेतकरी शेतमजूर, दलित, शोषित वर्गाचे हक्क अबाधित ठेवण्याची मोठी जबाबदारी दलित नेतृत्वाची आहे.

**५.२.२ रामदास आठवले यांच्या नेतृत्वाची वैचारिक दिशा :**

राजकीय चळवळीत नेता, विचारधारा कार्यक्रम आणि संघटना या बाबी महत्त्वाच्या असतात. राजकीय चळवळीतील नेतृत्वाकडे प्रभावी विचारधारा असावी लागते. विचारधारेच्या आधारे नेतृत्व संघटनात्मक बांधणी निष्ठावान कार्यकर्ते निर्माण करतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरानंतर आंबेडकरी विचारांचा वारसा सांगणाऱ्या नेतृत्वामध्ये रामदास आठवले हे एक आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विचाराबरोबर कृती संपन्न आंदोलने उभारली. विचाराचा उच्चार करून डॉ. बाबासाहेब थांबले नाहीत तर त्यांनी कृतीतून सादर केले. "बाबासाहेबांच्या आंदोलनाला श्रेष्ठ मूल्यांचे अधिष्ठान होते. या आंदोलनामागे कोणताही शूद्र स्वार्थ नव्हता. स्वार्थ होता; पण संपूर्ण उपेक्षित मानवतेच्या उत्थानाचा तो स्वार्थ होता. संपूर्ण अन्यायग्रस्त समुहाच्या मुक्तीशी या स्वार्थाने नाते जोडले होते. स्वत: कष्ट भोगून हे दु:खी लोकांसाठी चालवलेले नव्या जीवनाचे निर्माण होते. या सर्व आटापीटीमागे 'मी' हे ध्येय नव्हते. समाज हे ध्येय होते. हे सर्व रान उठवण्यामागे 'मी' चे कल्याण हा हेतू नव्हता तर राष्ट्रकारण हा उद्देश

होता. व्यक्तीसाठी नव्हे तर मूल्यांसाठी हे आंदोलन होते."[१०]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय चळवळीचा उद्देश व्यक्ती स्वार्थ नाही तर समाजहित हा होता. दलित, शोषित, वंचित समाजातील कल्याण हे ध्येय होते. त्याच्या चळवळीला वैचारिक मूल्यांची जोड होती.

रामदास आठवले या नेतृत्वाचे धर्मनिरपेक्षता, समाजवाद, संसदीय लोकशाही, स्वातंत्र्य, समता, बंधुता न्याय, या राजकीय मूल्यावर आधारित समाज निर्माण करणे, ही राजकीय विचारधारा आहे. रामदास आठवले यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा सांगत आपल्या नेतृत्वाची उभारणी केली. यांच्या नेतृत्वाखाली रिपब्लिकन पक्ष हा स्वतंत्र मजूर पक्ष, शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या विचारप्रणालीचा स्वीकार केला आहे. रामदास आठवले यांच्या १९७४ पासून ते आजपर्यंतच्या राजकीय वाटचालीचा अभ्यास केला असता त्यांच्या राजकीय विचाराची दिशा आंबेडकर विचाराबरोबर सत्ताकारणाला प्राधान्य देणारी दिसून येते. रिपब्लीकन ऐक्याचा प्रयोग फसल्यानंतर रामदास आठवले यांनी रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून आपली स्वतंत्र वाटचाल सुरु केली. १९९० मध्ये त्यांनी काँग्रेस पक्षाशी युती केली. काँग्रेसपक्षाशी युती करून शरद पवारांच्या मंत्रिमंडळात समाजकल्याण मंत्री झाले. काँग्रेसच्या विभाजनानंतर शरद पवारांनी १९९९ ला राष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष स्थापन केला. १९९९ ते २००९ पर्यंत राष्ट्रवादी सोबत युती होती. १९९९ ते २००४, २००४ ते २००९ या कालावधीत राष्ट्रवादीच्या मदतीने पंढरपूर लोकसभा मतदार संघातून दोनदा लोकसभेचे प्रतिनिधित्व केले. २००९ च्या मतदार संघ फेररचनेत पंढरपूर लोकसभा मतदार संघ संपुष्टात आला. त्यानंतर २००९ च्या लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादीशी युती तोडत काँग्रेसशी जवळीक साधून शिर्डी या अनु. जातीसाठी आरक्षित असलेल्या मतदार संघातून निवडणूक लढवली. या निवडणुकीत रामदास आठवले यांचा पराभव झाला. व्यक्तिगत पराभवाला आंबेडकरी चळवळीचा पराभव ठरवून रामदास आठवले यांनी

शिवसेना-भाजपाशी युती केली. शिवसेना - भाजपाशी युती करून रामदास आठवले यांच्या रिपब्लिकन पक्षाला २०१४ च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत एकही उमेदवार निवडून आणता आला नाही.

राजकारणाबाबत आपली भूमिका स्पष्ट करतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते , "राजकारण हा तुमच्यासाठी एक व्यवसाय असेल; पण माझ्यासाठी ते एक मिशन आहे. राजकीय सत्ता किंवा निवडणुकामधील विजय हे केवळ एक साधन आहे. साध्य हे देशातील कोट्यावधी दलित जनतेचा उध्दार !"[११]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकारणाचा मुख्य उद्देश हा दलितोध्दार हा होता. राजकारणाला डॉ. बाबासाहेब आबेडकर यांनी समाजपरिवर्तनाचे साधन म्हणून पाहिले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांच्या न्याय हक्कासाठी १९४६ च्या नेहरुंच्या हंगामी मंत्रिमंडळात मंत्रिपद स्वीकारले होते. कायदामंत्री म्हणून मांडलेल्या हिंदू कोड बिलाला विरोध होताच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कायदामंत्री पदाचा राजीनामा देऊन आपल्या स्वाभिमानी राजकारणाची प्रचिती दिली. काँग्रेसच्या मंत्रिमंडळ सहभागाबाबत बोलतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, "मी दगडासारखा घट्ट असल्यामुळे पाण्यात विरघळण्याची मला मुळीच भीती नाही. म्हणून काँग्रेस मंत्रिमंडळात सामील झालो तर माझ्यावर काहीही परिणाम होणार नाही, परंतु तुमची स्थिती मात्र वेगळी आहे. पाण्यात पडलेल्या ढेकळासारखे तुम्ही विरघळून जाल."[१२]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नेतृत्व हे पद, पैसा, प्रतिष्ठा यांच्या मोहाला बळी न पडणारे सात्विक नेतृत्व होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नंतरच्या नेतृत्वात या गुणाचा अभाव दिसून येतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना समाजाच्या नेतृत्वासंबंधी चिंता वाटत होती. ही चिंता व्यक्त करतांना म्हणाले, अथक प्रयासाने आणलेला हा विचाराचा गाडा तुम्हाला पुढे नेता आला नाही तर माघारी तरी नेवू नका. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नंतरच्या दलित राजकीय नेतृत्वाने हा विचाराचा

गाडा पुढे नेण्याऐवजी माघारी नेण्याचे कार्य केल्याचे दिसून येते.

आंबेडकरी विचारांचा वारसा सांगणारे नेतृत्व रामदास आठवले यांचे आहे. रामदास आठवले यांच्या राजकारणाचे विश्लेषण करतांना त्यांच्या राजकीय तत्व आणि व्यवहाराचा अभ्यास करावा लागतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित समाजाने शासनकर्ती जमात बनली पाहिजे असा उपदेश केला होता. परंतु शासनकर्ती जमात याचा अर्थ सत्तेसाठी विचाराचा बळी हवा असा नाही; ज्या प्रस्थापित पक्षाला बाबासाहेबांनी कडाडून विरोध केला. त्या पक्षाशी युती दलित नेतृत्वाने केली आहे. त्याला अपवाद रामदास आठवले नाहीत.

"रिपब्लीकन पक्षाचा प्रत्येक गट आजवर काँग्रेसच्या मांडवाखालून गेला. तुकडे फेकून काँग्रेसने रिपब्लीकन पक्षाचे वाटोळे केले. बहुजनांच्या नावाखाली काहींनी भाजपाशी छूपी युतीही केली. बहुजनांचा पॅटर्न राबविणाऱ्यांना एका जिल्ह्याच्या बाहेर पडता आले नाही. आता व्यक्तिगत पराभवाला आंबेडकरी चळवळीचा पराभव ठरवून रामदास आठवलेंनी शिवसेना-भाजपाशी युती करून आपली राजकीय आत्महत्या ओढवून घेतली आहे. शिवसेना भाजपास फुले - शाहू - आंबेडकरवाद तसेच भारतीय राज्यघटना मंजूर नाही. दलित, आदिवासी, खिश्चन, मुस्लिमांना त्यांना आत्मप्रतिष्ठेने जगू द्यावयाचे नाही. भारतीय राज्यघटनेने देशाचे नामाभिधान 'भारत' असे स्वीकारले आहे. यांना भारताचा हिंदुस्थान करावयाचा आहे. बाबासाहेबांना देशाच्या राज्यघटनेनुसार राज्यकारभार करावयाचा होता. हिंदुत्ववादी हिंदू धर्म ग्रंथ प्रमाण मानून राज्यकारभार करू इच्छितात. त्यांना आरक्षण मान्य नाही. बाबासाहेबांना ते इंग्रजांचा, निजामाचा हस्तक म्हणतात. नामांतरास विरोध, इंदू मिलवरील स्मारकास विरोध तर दुसरीकडे काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस श्रेयाचे हिडीस राजकारण खेळत आहेत.

बाबासाहेब मनुवाद्यांचे मुडदे गाडायला निघाले होते. आठवले संप्रदाय मात्र भाजपा - शिवसेनेच्या गळ्यात गळे घालत आहे. हा कोणता अगम्य आंबेडकरवाद

होय."[१३]

रामदास आठवले १९८९ साला पासून रिपब्लीकन पक्ष आठवले गटाचे नेतृत्व करतात. १९९० पासून ते १९९९ पर्यंत काँग्रेस सोबत होते. २६ जून १९९९ ला शरद पवार काँग्रेसमधून फुटून राष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष स्थापन केला तेव्हा ते १९९९ ते २००९ या काळात शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस सोबत होते. १९९० ते १९९५ या काळात शरद पवाराच्या मदतीने रामदास आठवले यांना महाराष्ट्राच्या राजकारणात सत्ता सहभाग मिळाला ते महाराष्ट्राचे समाजकल्याण मंत्री झाले. १९९९-२००४, २००४ ते २००९ या काळात पंढरपूर लोकसभा मतदार संघातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या मदतीने लोकसभेत दोनदा प्रतिनिधित्व केले. २००९ ला राष्ट्रवादी काँग्रेसशी फारकत घेत त्यांनी काँग्रेसशी युती केली. २००९ च्या लोकसभा निवडणुकीत शिर्डी लोकसभा मतदार संघातून निवडणूक लढवली. या निवडणुकीत स्वकीय पक्षातील दगाबाजीने रामदास आठवले यांचा पराभव झाला. आपला पराभव हा आंबेडकरी चळवळीचा पराभव ठरवत रामदास आठवले यांनी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यावर आरोप करत आंबेडकरी विचाराशी परस्पर विरोधी असलेल्या सेना - भाजपाशी युती केली. युतीच्या बदल्यात रामदास आठवले यांना राज्यसभेची खासदारकी मिळाली. रामदास आठवले यांच्या शिवसेना - भाजप युतीचा राज्यभरातून सकारात्मक नकारात्मक प्रतिक्रिया विचारवंत नेते, आंबेडकरनिष्ठ कार्यकर्त्यांनी दिल्या.

राजकीय नेतृत्वाच्या राजकीय वर्तनाचा अभ्यास करीत असतांना नेतृत्वाला राजकीय सत्ता महत्त्वाची असते. सत्तेच्या प्राप्तीसाठी राजकीय तडजोड करावी लागते. समकालीन राजकारणात कोणत्याही एका नेतृत्वाच्या किंवा पक्षाच्या स्वबळावर निवडणुकीमध्ये राजकीय यश संपादन करता येणे शक्य नाही. त्यामुळे युती आणि आघाड्यांच्या राजकारणाला चालना मिळाली. रामदास आठवले यांनी आंबेडकरी विचारांशी विसंगत आणि विरोधी विचारांच्या पक्षाशी युती केली. ही युती रामदास

आठवले शिवसेना आणि भाजप तिघांच्या राजकीय गरजेतून झाली आहे हे नाकारता येत नाही. ही युती करीत असतांना रामदास आठवले यांनी आपला आंबेडकरी विचार सोडला किंवा गहाण ठेवला अथवा त्यांना विसर पडला नाही. त्यांनी आपला आंबेडकरी विचार सुरक्षित ठेवण्यासाठी पनवेल याठिकाणी नेत्यांची आणि कार्यकर्त्यांची बैठक बोलावून आपल्या पक्षाचा स्वतंत्र राजकीय अजेंडा ठरवला. त्यामध्ये भारतीय राज्यघटना, धर्मनिरपेक्षता मागासवर्गीयांना खासगी क्षेत्रात आरक्षण अशी भूमिका घेतली. त्यामुळे आंबेडकरी विचारांचा रामदास आठवले यांनी बळी दिला असे म्हणता येणार नाही. ही युती फक्त राजकीय निवडणुकीसाठीची युती आहे. राजकीय गरजेतून युती झाली म्हणून रामदास आठवले यांनी शिवसेना भाजपला मदतीचा हात पुढे केला आहे. भविष्यात आंबेडकरी विचारांचा शिवसेना भाजपाकडून बळी जात असेल तर त्यांना हात देण्याची धमक ही त्यांच्या नेतृत्वात असावी. हे रामदास आठवले यांच्या नेतृत्वाची कसोटी पाहणारा आहे. म्हणून राजकारणात राजकीय नेतृत्वाला राजकीय विचारांशी तडजोड करावी लागते. राजकीय तडजोडी शिवाय सत्ता प्राप्त करता येत नाही. आठवले यांच्या युत्या ह्या त्याचाच एक भाग आहे. नेत्याने सत्तेच्या माध्यमातून कार्यकर्ते आणि समाज यांच्या कल्याणाचा, विकासाचा विचार केला पाहिजे. सत्तेच्या माध्यमातून सामाजिक अभिसरण झाले पाहिजे.

### ५.२.३ रामदास आठवले यांच्या नेतृत्वाचा प्रभाव :

राजकीय नेतृत्वाचा महत्त्वाचा घटक म्हणजे नेतृत्वाचा प्रभाव होय. राजकीय नेतृत्व आपल्या वैशिष्ट्यपूर्ण गुणांच्या आधारे आपला प्रभाव निर्माण करते. राजकीय नेतृत्वाच्या प्रभावावर त्या नेतृत्वाची यशस्विता अवलंबून असते. राजकीय नेतृत्वाच्या प्रभावाबाबत रॉबर्ट डायलेनशिल्डर आपल्या Power and Influence या ग्रंथात म्हणतात, "The three components of this Triangle are communication, Recognization and Influence you start to communicatte

effectively this lead to recognization in turn leads to influence"[१४]

राजकीय नेतृत्वाला जनमाणसात आपला प्रभाव निर्माण करण्यासाठी विविध गुणांच्या आधारे प्रभाव निर्माण करावा लागतो. जॉन सी मॅक्सवेल या विचारवंताने आपल्या Leadership या ग्रंथात राजकीय नेतृत्वाला प्रभाव निर्माण करण्यासाठी पाच पायऱ्या सांगितल्या आहेत.

" १) Possition - People follow Beacause they have to

२) Permission - People following because they want to

३) Production - People follow beacuse of what you have done for the organization.

४) People Development - People follow because of what you have done for them.

५) Personshood - People follow because of who you are and what you represeat.

नेतृत्व हे प्रभाव पाडणारे असते. म्हणून नेतृत्वाला आपला प्रभाव निर्माण करण्यासाठी जॉन सी. मॅक्सवेल याने वरील पाच पायऱ्या सांगितल्या आहेत. नेतृत्व आपल्या गुणांमुळे प्रभावशाली ठरत असल्याने इतर लोक तिचे स्वेच्छेने अनूयायीत्व स्वीकारतात. नेतृत्वाच्या प्रभावी गुणांतूनच समाजात व्यापक असा प्रभाव निर्माण होतो.राजकीय नेतृत्वाजवळ विचारधारा आणि कार्यक्रम असल्यामुळे सामान्य जनतेच्या जीवनाला आकार देण्याचे काम नेतृत्व करते.

राजकीय नेतृत्वाकडे एखाद्या वैशिष्ट्यपूर्ण गुणांमुळे जनमानसात त्यांचा प्रभाव निर्माण होतो. जनसंपर्क, विचारधारा, कार्यक्रम, वक्तृत्व , कर्तृत्व आणि सात्विक गुणामुळे नेतृत्व आपला प्रभाव निर्माण करतो. रामदास आठवले या नेतृत्वाच्या प्रभावाच्या जडण घडणीत त्यांच्यात असलेला तळागाळातल्या, गावागावतल्या कार्यकर्त्यांशी असणारा

संपर्क, ग्रामीण भागातील लोकांशी असणार जिव्हाळ्याचं नातं. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात दलितांवरील अन्याय झाल्यास पहिल्यांदा धाऊन जाणारा ; तो जमिनीवर उभा राहणारा एक सच्चा कार्यकर्ता या गुणांमुळे रामदास आठवले या नेतृत्वाचा महाराष्ट्रातील पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा विभागात व्यापक असा प्रभाव दिसून येतो.

रामदास आठवले हे सांगली जिल्ह्यातील पश्चिम महाराष्ट्रातील असल्यामुळे पश्चिम महाराष्ट्रात रामदास आठवले यांचा प्रभाव दिसून येतो. १९९० पासून रामदास आठवलेंच्या नेतृत्वाने काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना भाजपासोबत आघाडी युतीचे राजकारण करीत आले आहेत. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाखाली मजबूत पक्ष संघटना आणि स्वत:ची स्वतंत्र Vote Bank या नेतृत्वाला निर्माण करता आली नाही. स्वबळावरील निवडणुकीत या नेतृत्वाला आत्मविश्वास दिसून येत नाही. म्हणून रामदास आठवले राज्यभर आपला व्यापक असा प्रभाव निर्माण करू शकले नाही. लोकसभा निवडणूक २०१४ आणि महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१४ च्या निवडणुकीत शिवेसना - भाजपा सोबत युती करून ही राज्यात एकही खासदार - आमदार निवडून आणता आला नाही. मुंबई महानगरपालिकेतही अपेक्षित यश संपादन करता आले नाही. यावरुन रामदास आठवलें यांचा व्यापक असा प्रभाव दिसून येत नाही.

**५.२.४ रामदास आठवले यांच्या नेतृत्वाचा राजकारणातील सत्ता सहभाग :**

राजकीय नेतृत्वाचा संबंध सरळ राजकारणाशी असतो. राजकारणाचे स्वरुप पूर्णपणे व्यावहारिक असते. नेतृत्व राजकारणाच्या माध्यमातून सत्ता प्राप्तीचा प्रयत्न करते. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्यानंतर सर्व जाती धर्मियांना राजकारणातील सत्ता सहभाग समान प्रमाणात मिळाला नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित, वंचित, अस्पृश्यांना राजकारणात सत्ता सहभाग मिळावा यासाठी लंडन येथील गोलमेज परिषदेत दलितांच्या राजकीय न्याय हक्कासाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली. स्वतंत्र

मतदार संघाऐवजी पुणे करारानुसार राखीव मतदार संघ मिळाले. सत्ता सहभागापासून वंचित असलेल्या दलित समाजाला राजकारणातील सत्ता सहभागाचा मार्ग पूर्णपणे खुला झाला होता. सत्ता हे समाजपरिवर्तनाचे साधन असल्यामुळे सत्तेच्या माध्यमातून दलित, शोषित, वंचित , समुहाचे सामाजिक राजकीय , आर्थिक, शैक्षणिक समस्या सोडवण्यासाठी वंचित समुहातून नेतृत्व निर्माण झाले.

रामदास आठवले हे सुध्दा महाराष्ट्रातील दलित वंचित समुहाचे नेतृत्व म्हणून पुढे आले आहे. रामदास आठवले यांच्या २५ वर्षाच्या राजकीय वाटचालीत त्यांचा सत्ता सहभागाचा अभ्यास करीत असतांना रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखालील रिपब्लिकन पक्षाचा राजकारणातील सत्ता सहभागाचे विश्लेषण केले आहे. राजकीय प्रतिनिधित्वाबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, "राजकीय नेतृत्व कोण व कोणाचे प्रतिनिधित्व करू शकते हा यातील मध्यवर्ती मुद्दा होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गोलमेज परिषदेत एकमेव गांधीच कसे काय नेतृत्व करू शकतात असा प्रश्न उपस्थित केला होता. अस्पृश्यांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी वेगळे प्रतिनिधित्व हवे असे त्यांचे आग्रही मत होते. 'आमचं प्रतिनिधित्व आम्हीच करू शकतो. आमचं वास्तव, वेदना दुसरे समजून घेऊ शकत नाही. इथे प्रश्न उपस्थित होतो की, आमच्यावतीने कृती करण्याचा अधिकार इतरांना कसा पोहचतो ?"[१५]

स्वातंत्र्योत्तर भारतीय राजकारणात जाती - जमातींना महिलांना प्रतिनिधित्व मिळाले खरे; पण वास्तविक राजकारणात राजकीय सत्ता सहभाग मात्र नाकारला जातो. त्या- त्या जाती-जमाती महिला, वर्गाच्या प्रश्नांचे वास्तव इतरांपेक्षा त्यांना त्यांची जाणीव असते. म्हणून त्यांचा सामाजिक राजकीय, आर्थिक, शैक्षणिक विकास करण्यासाठी राजकीय सत्ता सहभाग असावा लागतो. सत्ता सहभागाशिवाय त्या जातीचा वर्गाचा सर्वांगीण विकास होऊ शकत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संकल्पनेतील रिपब्लीकन पक्षात सर्व जाती धर्मियांना सामावून घेऊन त्यांना प्रतिनिधित्व मिळाले

पाहिजे अशी व्यापक भूमिका मांडली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा वारसा सांगणाऱ्या नेतृत्वाला अशी व्यापक भूमिका प्रस्थापित करण्यात अपयश आले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर रिपब्लिकन पक्ष हा वेगवेगळ्या गटात विभागला गेला. रामदास आठवले यांनी रिपब्लीकन पक्षाच्या एका गटाचे नेतृत्व करीत आहेत. १९९० पासून आजतागायत रामदास आठवले यांचे राजकारणातील सत्ता सहभागाचे विश्लेषण करतांना रामदास आठवले स्वतः १९९० ते १९९५ शरद पवारांच्या मदतीने महाराष्ट्राचे समाजकल्याण मंत्री झाले. १९९८-९९ लोकसभा सदस्य होते. १९९९-२००४, २००४-२००९ पंढरपूर लोकसभा मतदार संघातून दोनदा प्रतिनिधित्व केले. २०१४ मध्ये भाजपाच्या मदतीन राज्यसभेवर निवडून गेले. रामदास आठवले यांचा महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील समावेश. हा शद पवारांच्या मदतीने झाला होता. १९९८ च्या लोकसभा निवडणुकीत बाळासाहेब आंबेडकर, रा.सु. गवई, जोगेंद्र कवाडे, रामदास आठवले या चारही नेत्यांनी एकत्र येऊन काँग्रेस पक्षाशी युती केली. काँग्रेसच्या मदतीने या चारही नेत्यांचा १९९८ च्या लोकसभा निवडणुकीत विजय झाला. हा रिपब्लिकन ऐक्याचा विजय होता. १९९९ ऐक्य भंगले आणि १९९९ शरद पवारांनी काँग्रेसशी फारकत घेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्थापन केला. १९९९ च्या लोकसभा निवडणुकीत रामदास आठवले यांच्या रिपब्लीकन पक्षाने राष्ट्रवादी काँग्रेस सोबत युती करून १९९९ च्या लोकसभा निवडणुकीत पंढरपूर लोकसभा मतदार संघातून विजयी झाले. २००४ च्या लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या मदतीने दुसऱ्यांदा पंढरपूर लोकसभा मतदार संघातून विजयी झाली. २००९ ला राष्ट्रवादी काँग्रेसशी फारकत घेऊन काँग्रेस पक्षाशी युती केली. २००९ च्या लोकसभा निवडणुकीत शिर्डी लोकसभा मतदार संघातून काँग्रेसशी युती करून निवडणूक लढवली. या निवडणुकीत रामदास आठवले यांचा पराभव झाला.

२००९ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला धडा शिकवण्यासाठी रिडालोसची निर्मिती केली. रिडालोसच्या माध्यमातूनही रामदास आठवले यांना एकही विधानसभा सदस्य निवडून आणता आला नाही. त्यानंतर रामदास आठवले यांनी काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सत्तेतून खाली खेचण्यासाठी परस्पर विरोधी विचारधारा असलेल्या शिवसेना - भाजप या विरोधी पक्षाशी युतीची घोषणा करून महाराष्ट्राच्या राजकारणात नवा राजकीय अध्याय सुरु केला.

रामदास आठवले यांच्या शिवसेना भाजपाच्या युतीबाबत जनमाणसातून सकारात्मक, नकारात्मक प्रतिक्रिया उमटल्या. सामाजिक अभिसरणासाठी आणि राजकीय परिवर्तनासाठी ही युती आहे असे रिपब्लिकन पक्षाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले. शिवसेना भाजपाच्या युतीतून रामदास आठवले यांनी राज्यसभेची उमेदवारी प्राप्त करून घेतली. रामदास आठवले यांच्या राजकारणाबाबत राजकीय विश्लेषक म्हणतात, रामदास आठवले हे स्वहिताला प्राधान्य देणारे आणि कार्यकर्त्याकडे दुर्लक्ष करणारे नेते आहेत अशी टीका होते.

राजकीय नेतृत्वाकडे विचारधारा, राजकीय , कार्यक्रम, मजबुत पक्ष संघटना असल्याशिवाय राजकीय नेतृत्वाला आपल्या कार्यकर्त्यांना राजकारणातील सत्ता सहभाग मिळवून देता येत नाही. निश्चित राजकीय कार्यक्रम, मजबूत पक्ष संघटना, स्वबळावरील निवडणुका जिंकण्याबाबत आत्मविश्वासाचा अभाव रामदास आठवले यांच्या नेतृत्वामध्ये दिसून येतो. रामदास आठवले यांच्याशिवाय पक्षातील अन्य कार्यकर्त्यांना राजकारणातील अपेक्षित सत्ता सहभाग मिळू शकला नाही. रामदास आठवले यांच्या नेतृत्वाकडून रिपब्लीकन पक्षाचे मजबूत पक्ष संघटना, प्रभावी राजकीय कार्यक्रम, निष्ठावान, प्रशिक्षित कार्यकर्ता निर्माण करून स्वबळावर निवडणुकीचे राजकारण केले नसल्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात व्यापक असा प्रभाव निर्माण करण्यात अपयश आल्याचे दिसून येते.

**तक्ता क्र. १**

**रामदास आठवले यांच्या नेतृत्वातील रिपब्लीकन पक्षाचा संसद, विधीमंडळ, स्थानिक स्वराज्य संस्था मधील २०१४ पर्यंत प्रतिनिधित्व दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | लोकसभा | राज्यसभा | विधानसभा | विधान परिषद | महानगरपालिका | नगरपालिका | जि.प. | पं.स. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ०० | ०१ | ०० | ०० | ०२ | १७ | २० | ०० |

तक्ता क्र. १ वरुन असे निदर्शनास येते की, २०१४ च्या लोकसभा विधान सभेसाठी रामदास आठवले यांनी राष्ट्रवादीशी युती तोडून शिवसेना - भाजपशी युती केली. रामदास आठवले यांच्या रिपब्लीकन पक्षाला साताऱ्याची एक जागा दिली. त्या एका जागेवर रिपब्लिकन पक्षाला विजय मिळवता आला नाही. कारण शिवसेना - भाजपाने सातारा ही पराभूत होणारी जागा दिली. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेना आणि भाजपाने स्वतंत्रपणे निवडणुका लढवल्या. रामदास आठवले यांनी भाजपासोबत राहिले. भाजपाने रामदास आठवले यांच्या रिपब्लीकन पक्षाला ०३ जागा दिल्या. त्यात चेंबूरमधून दिपक निकाळजे यांना ३६६१५ मते मिळाली ते तिसऱ्या क्रमांकावर होते. पिंपरी विधानसभा मतदारसंघातून चंद्रकांता सोनकांबळे यांना ४७२८८ मते मिळाली. त्या तिसऱ्या क्रमांकावर होत्या. देगलूर मतदार संघातून भिमराव क्षिरसागर यांना २०५४२ मते मिळाली. ते तिसऱ्या क्रमांकावर होते. विधानसभेच्या तिन्ही उमेदवारांना तिसऱ्या क्रमांकाची मते मिळाली. भाजपासोबत युती करून सुध्दा रिपब्लिकन पक्षाचा एकही उमेदवार निवडून आला नाही. कारण भाजपातील त्या मतदार संघातील जेष्ठ नेत्यांनी रिपब्लीकन पक्षाच्या उमेदवारास मदत करण्याऐवजी अन्य पक्षाच्या उमेदवाराला मदत केल्याचे दिसून आले. नांदेड जिल्ह्यातील देगलूर विधानसभा मतदार संघात भाजपाच्या जेष्ठ नेत्यांनी शिवसेनेच्या उमेदवारास मदत केल्याने शिवसेनेच्या उमेदवाराचा विजय झाला.

रामदास आठवले यांनी राजकारणाऐवजी सर्व रिपब्लीकन गटांना एकत्र करून निवडणूक लढवावी. सर्व रिपब्लीकन गट एकत्र येऊन निवडणूक लढल्यास महाराष्ट्राच्या राजकारणात एक प्रभावी तिसरी शक्ती म्हणून रिपब्लीकन पक्ष पुढे येण्याची क्षमता आहे. ही क्षमता ओळखून दलित नेतृत्वाने एकत्र यावे. अन्यथा सर्व दलित नेतृत्वाची राजकीय हेळसांड / फरपट अशीच होत राहील.

रिपब्लीकन पक्षाचा सामाजिक आधार असलेली पूर्वाश्रमीची महार जात आणि आजच्या धर्मांतरीत बौध्द समाजाच्या महाराष्ट्रातील विविध भागांत असलेल्या लोकसंख्येच्या प्रमाणालाही महाराष्ट्राच्या राजकारणावर प्रभाव दिसून येतो. "बौध्दांचे लोकसंख्येतील प्रमाण कोकणात ०६टक्के , पश्चिम महाराष्ट्रात ८ टक्के, मराठवाड्यात १०-१२ टक्के तर विदर्भात २०-२२ टक्के इतके आहे. पश्चिम महाराष्ट्रातही सांगली, सोलापूर, पुणे, जिल्ह्यात त्यांची लोकसंख्या बरीच मोठी आहे. तसेच स्थलांतरामुळे मुंबईतही हा समाज मोठ्या प्रमाणात राहतो."[१६]

महाराष्ट्राच्या राजकारणात त्या-त्या विभागातील जातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणाचा प्रभाव दिसून येतो. महाराष्ट्रातील कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाड्याच्या तुलनेत विदर्भात बौध्द धर्मियांचे प्रमाण जास्त असल्यामुळे विदर्भातील राजकारणावर बौध्द धर्मीयाचा व्यापक प्रभाव दिसून येतो. रामदास आठवले यांच्या नेतृत्वाचा पश्चिम महाराष्ट्र, मराठवाड्यात प्रभाव दिसून आला. मुंबई, ठाणे जिल्ह्यातील एकूण ४८ मतदार संघापैकी चेंबूर, ट्रॉम्बे, शिवडी, नायगांव, भांडूप, गोरेगावं, सांताक्रुझ, घाटकोपर, अंबरनाथ या नऊ मतदार संघात प्रतिस्पर्धी पक्षांना पाडण्याची किंवा मित्रपक्षांना जिंकवण्याची शक्ती रामदास आठवले यांच्या नेतृत्वातील रिपब्लीकन पक्षात आहे.

उत्तर महाराष्ट्रात चाळीसगाव, भुसावळ, देवळाली, धुळे, नाशिक, मतदार संघात तर मराठवाड्यात गंगाखेड, केज, कळंब मतदारसंघात आणि पश्चिम महाराष्ट्रात मंगळवेढा, कर्जत, उत्तर सोलापूर, भवानी पेठ, बोपोडी या मतदार संघात निवडणुकीचे

समीकरण बदलण्याची ताकत रामदास आठवले यांच्या नेतृत्वात आहे. महाराष्ट्रातील मुंबई, ठाण्यासह पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यात रामदास आठवले यांचा प्रभाव मोठ्या प्रमाणात दिसून येते.

**५.२.५ रामदास आठवले यांच्या नेतृत्वांचा जनसंपर्क / जनाधार :**

राजकीय नेतृत्व जनसंपर्कांच्या माध्यमातून मजबूत संघटनात्मक बांधणी करते. संघटनेच्या बळावर राजकीय नेतृत्वाचे राजकीय यशापयश अवलंबून असते. नेता आणि अनुयायी यांना जोडणारा मार्ग म्हणजे जनसंपर्क होय. जनसंपर्काच्या माध्यमातून नेतृत्व आपल्या संघटनेत माणसे जोडण्याचे कार्य करतो. "माणसे एकत्र आली की, गट तयार होतात. वेगवेगळे गट एकत्र आले की, संघटना, महासंघटना सिध्द होते. सगळी माणसे एका सूत्रात बांधली गेली की एक शक्ती तयार होते. महाशक्ती तयार होते. ही महाशक्ती समाजाची दिशा बदलू शकते."[१७]

राजकीय नेतृत्वातील आपल्या संघटनेचे रुपांतर महासंघटनेत करण्यासाठी जनसंपर्कांच्या माध्यमातून माणसं जोडत असतो आणि जोडलेल्या माणसांशी आपला संवाद कायम ठेवतो. नेता आणि अनुयायी यांच्यात राजकीय संवाद निर्माण करण्याचे काम जनसंपर्क करते. जनसंपर्क प्रस्थापित करण्याच्या पारंपरिक आणि आधुनिक पध्दती अशा दोन पध्दती आहेत. पारंपरिक जनसंपर्कात नेतृत्व विविध राजकीय कार्यक्रम, जाहिर सभा, संमेलने, मेळावे, आरोग्य शिबिर, महिला मेळावे, रोजगार मेळावे, शेतकरी मेळावे, विविध सण उत्सवांच्या माध्यमातून राजकीय नेतृत्व जनसंपर्क वाढवित असते तर आधुनिक राजकीय व्यवस्थेत जनसंपर्कात नेतृत्व आपल्या अनुयायांशी Facebook, twitter, Blogs या सामाजिक माध्यमांच्या माध्यमातून जनसंपर्क प्रस्थापित करू शकते. समकालीन काळात नेतृत्व या आधुनिक सामाजिक माध्यमांचा वापर करीत आपली राजकीय आधुनिकता सिध्द केली आहे. २०१४ च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत अनेक नेतृत्वांनी या सामाजिक माध्यमांचा वापर

परिणामकारकरित्या करून घेतला. त्यांचे चांगले राजकीय परिणाम त्यांना मिळाले आहेत.

राजकीय नेतृत्व जनसंपर्क प्रस्थापित करीत असतांना विविध संस्था संघटनाचे अध्यक्षपद भूषवूनही जनसंपर्क प्रस्थापित करते. समाज हा राजकारणाची प्रयोगशाळा असल्याने नेतृत्व विशिष्ट राजकीय उद्देश निर्धारित करून, राजकीय तत्व, आदर्श, विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून या विशिष्ट प्रक्रियेद्वारा नेता अनुयायांशी जनसंपर्क प्रस्थापित करतो. नेतृत्वास जनसंपर्काच्या जोरावर सामाजिक अभिमान्यता प्राप्त होते. रामदास आठवले यांनी पक्षाची विविध मेळावे, कार्यक्रम, धम्मपरिषद, महिला मेळावे, विद्यार्थी मेळावे इत्यादींच्या माध्यमातून जनसंपर्क प्रस्थापित करतात.

Facebook आणि Republican Party of India. org या पक्षाच्या अधिकृत संकेत स्थळावरुन जनसंपर्क आहे. याशिवाय रामदास आठवले यांनी संपादक, भुमिकासाप्ताहिक, प्रकाशक, परिवर्तन प्रकाशन, अध्यक्ष परीवर्तन कला महासंघ, अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशन, अध्यक्ष, बुध्दिस्ट महासंघ, अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशन, अध्यक्ष, बुध्दिस्ट कलावंत ॲकडमी, अध्यक्ष रिपब्लीकन एम्पलाई फेडरेशन, अध्यक्ष मुन्सिपल मजदूर संघ इत्यादी संस्था संघटनाचे अध्यक्षपद स्वीकारुन समाजातील विविध वर्गातील गटातील लोकांशी जनसंपर्क प्रस्थापित केला आहे. राजकीय नेतृत्वाला गैर राजकीय संस्था संघटनाच्या माध्यमातून कार्यक्रमातून उपक्रमातून समाजातील विविध स्तरातील लोकांशी प्रभावी जनसंपर्क प्रस्थापित करता येतो.

जनसंपर्क हा राजकीय नेतृत्वाचे मुख्य भांडवल आहे. या भांडवलाच्या जोरावर राजकीय नेतृत्व राजकारणात यशाची शिखरे पादाक्रांत करीत असते. म्हणून राजकीय नेतृत्वाचे राजकीय यशापयश जनसंपर्कावर अवलंबून असते. जनसामान्याच्या कोणत्या इच्छा, आकांक्षा याची जाण असणारा आणि त्याच्या पूर्ततेसाठी झटणारा नेताच

जनसामान्यांच्या हृदयात आपले अस्तित्व निर्माण करतो. रामदास आठवले यांचे नेतृत्व दलित पँथरमधून निर्माण झाले. रामदास आठवले यांचे नेतृत्व सर्व सामान्यांकरिता लढणारा एक पँथर आहे. महाराष्ट्रातील कोणत्याही भागात दलितांवर अन्याय अत्याचार होतात. त्याठिकाणी सर्वप्रथम जाऊन त्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करतात. खैरलांजी आणि अहमदनगर जिल्ह्यातील घटनाच्या वेळी, तिव्र आंदोलन पक्षाच्या वतीने करण्यात आली.

नांदेड जिल्ह्यातील हिमायतनगर तालुक्यात निर्मलाबाई हनवते आणि अब्दुल करीम बाकी यांच्यात आर्थिक हितसंबंधातून मतभेद झाले होते. या मतभेदातून अब्दूल करीम बाकी आणि त्यांच्या अन्य सहकाऱ्यांनी दिनांक १६/१०/२०१२ रोजी निर्मलाबाई हनवते यांचा दिवसाढवळ्या मुख्य रस्त्यावर त्यांच्या अंगावर ट्रॅक्टर घालून निर्घृण खूण करण्यात आला होता. या दलित महिलेचा निर्घृन खून झाल्याची बातमी माध्यमांमार्फत महाराष्ट्राभर पसरली. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन रामदास आठवले यांनी दिनांक १८/०१/२०१२ रोजी हिमायतनगर येथे निर्मलाबाई हनवते यांच्या कुटुंबियांना भेट देऊन आर्थिक मदत केली आणि दोषीवर लवकरात लवकर कार्यवाही करण्यात यावी. यासाठी महाराष्ट्राचे तत्कालीन गृहमंत्री आर.आर. पाटील यांची भेट घेतली. या प्रकरणाचा छडा लावल्यामुळे दोषींना शिक्षा झाली. पीडित दलित महिलेच्या कुटूंबियांना न्याय मिळवून दिला. म्हणून रामदास आठवले यांचे नेतृत्व हे जमिनीवरच्या सच्च्या कार्यकर्त्याप्रमाणे आहे. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील गावागावात त्यांचा जनसंपर्क चांगला आहे. रामदास आठवले यांच्या नेतृत्वातील महत्त्वाची बाब म्हणजे त्यांचा महाराष्ट्रातील जनतेशी असलेला जनसंपर्क आहे.

जनसंपर्काच्या माध्यमातून नेतृत्व आपला जनाधार प्राप्त करीत असतो. रामदास आठवले यांचा जनसंपर्क महाराष्ट्रातील गावात चांगल्यापैकी आहे; परंतु जनसंपर्काच्या माध्यमातून मजबूत संघटनात्मक बांधणी करून विशिष्ट राजकीय कार्यक्रमाच्या

आधारे सर्व जाती धर्मियांना एकत्र करून स्वबळावरील निवडणुकीत यश संपादन करता येते; पण रामदास आठवले यांच्याकडून असा प्रयत्न झाल्याचे दिसून येत नाही.

**५.२.६ रामदास आठवले यांची रिपब्लीकन ऐक्याबाबत भूमिका :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र मजूर पक्ष, शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या माध्यमातून दलित समाजाला त्याचे हक्क प्रदान करून समाजात सामाजिक, आर्थिक, राजकीय न्यायावर आधारित व्यवस्था निर्माण करावयाची होती. शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन हा एक जातीय पक्ष बनल्यामुळे अपेक्षित प्रभाव हा पक्ष निर्माण करू शकला नाही. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले राजकीय मिशन साध्य करण्यासाठी सर्व, जाती धर्मियांना सामावून घेणारा सर्व समावेशक असा रिपब्लीकन पक्ष स्थापन करावयाचे स्वप्न त्यांनी आपल्या खूल्या पत्रातून व्यक्त केले होते.

"सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक आणि राजकीय विषमतेच्या आगीत जळणाऱ्या भोवतीच्या सर्वच प्रजेच्या सत्तेचे ध्येय वागवणारा पक्ष म्हणजे रिपब्लीकन पक्ष होता."[११] सर्व जाती - धर्मियांना एकत्र करून सामाजिक, आर्थिक, राजकीय, न्याय निर्माण करून बहुजन जनतेला शासनकर्ती जमात बनवण्याचे राजकीय स्वप्न बाबासाहेबांचे होते. रिपब्लीकन पक्षाच्या स्थापनेविषयी भूमिका स्पष्ट करतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, "तुम्हाला धर्मापेक्षा राजकारणात अधिक उत्साह वाटतो, परंतु मला राजकारणापेक्षा धर्मात विशेष रस वाटतो. शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनने दलित वर्गात स्वाभिमान व आत्मप्रतिष्ठा निर्माण केली आहे. दलित वर्गीयांनी आपल्यामध्ये आणि इतर समाजामध्ये एक मोठी भींत उभी केली आहे, परंतु दलित वर्गीयांची परिस्थिती अशा थराला आली आहे की, अस्पृश्य वर्गातील उमेदवारांना इतर लोक मते देत नाही आणि ते स्वत: सुध्दा दुसऱ्या समाजातील लोकांना मते देत नाहीत. तेव्हा त्यांनी ज्या लोकांना दलितांच्या साह्याने एक राजकीय पक्ष स्थापन करावा. दुसऱ्या पक्षातील नेत्याबरोबर काम करण्याचा प्रयत्न करावा इतपत परिस्थितीचा आढावा

घेण्याची वेळ आलेली आहे. दलितांचे मानवी हक्काचे वा अन्य संघर्ष हे संविधानाच्या मर्यादेतच आणि लोकशाहीच्या चौकटीतच सोडवले गेले पाहिजे."[१९]

दलितांना राजकीय हक्क मिळवून देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना केली होती, पण शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनच्या उमेदवारास अन्य जातींचे लोक मतदान करीत नव्हते. यामुळे हा पक्ष एक जातीय पक्ष बनला होता. एका जातीच्या मदतीने शासनकर्ती जमातीचे स्वप्न शक्य नव्हते. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व जाती - धर्मियांना सामावून घेणारा सर्व समावेशक रिपब्लीकन पक्ष स्थापन करण्याचा उद्देश होता; परंतु रिपब्लीकन पक्ष स्थापना करण्यापूर्वीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आकस्मिक महापरिनिर्वाण हा दलित चळवळीवरचा मोठा आघात होता. या आघातून दलित चळवळ सावरु शकली नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरानंतर तोलामोलाचा नाही, पण किमान त्यांचा वसा आणि वारसा समाजात निष्ठेने चालवू शकेल असा नेता समाजाला लाभला नाही. दलितांचे शासनकर्ती जमातीचे स्वप्न नंतरच्या राजकीय नेतृत्वांना साकारता आले नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नंतरचे नेतृत्व हे देणारे होण्यापेक्षा मागणारे निर्माण झाले. सौदेबाजीच्या राजकारणात ०३ ऑक्टोबर १९५७ ला स्थापना झालेला रिपब्लीकन पक्ष दोन वर्षाच्या आतच फुटला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना हयातीतच नेतृत्वासाठी सत्ता, पद, प्रतिष्ठेसाठी चाललेली अनुयायांची स्पर्धा दिसून येत होती. या बाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी एक खंत व्यक्त केली. "मी हा समाज कार्याचा रथ मोठ्या कष्ठाने जिथे आज दिसतो तिथपर्यंत आणलेला आहे. त्यास पुढे जर नेता आले नाही, तर तो तिथेच ठेवा, परंतु त्यास कुठल्याही परिस्थित मागे आणू नका. हाच माझा आपल्याला संदेश आहे."[२०]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना परकियांपेक्षा समाजातीलच लोकांकडून

धोका होईल अशी भिती वाटत होती. ती खरी ठरली. त्यांच्या नंतरच्या नेतृत्वानी सत्ता, पद प्रतिष्ठा, वैचारिक मतभेदातून, स्थापन केलेला रिपब्लीकन पक्ष दोन वर्षातच फुटला, दादासाहेब गायकवाड आणि बी.सी. कांबळे यांच्यात वैचारिक मतभेद होऊन रिपब्लीकन पक्षाचे नादुरुस्त - दुरुस्त हे दोन गट पडले. आर.डी. भंडारे यांनी समेट आणि सलोखा स्थापना करण्याची विनंती केली, परंतु ती निरर्थक ठरली.

१९६३ मध्ये पुन्हा रिपब्लीकन पक्षाच्या ऐक्याविषयी प्रयत्न करण्यात आला. १९५७ च्या निवडणुकीत जसे यश आले होते तसे १९६२ च्या निवडणुकीत आले नाही. त्यामुळे दोन्ही गटातील नेतृत्वाचे डोळे उघडले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पूत्र भैय्यासाहेब आंबेडकर यांनी दादासाहेब गायकवाड आणि कांबळे गटात समन्वय घडूवन आणण्याचा प्रयत्न केला, परंतु एकी होऊ शकली नाही.

"१९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पूर्वी एक वर्ष म्हणजे १९६६ मध्ये दादासाहेब रुपवते यांनी ऐक्यविषयक प्रयत्न करण्याच्या कामी पुढाकार घेतला. त्यांनी रिपब्लीकन ऐक्य समिती तयार करून सभा संमेलनाद्वारे ऐक्याच्या संदर्भात जनजागृती करण्याचा प्रयतन केला. सर्व प्रमुख पुढाऱ्यांना एकत्र बसवून त्यांच्यामध्ये समेट घडवून आणण्यासाठी त्यांनी पुण्यात ऐक्य परिषद बोलावली. या परिषदेत सर्व प्रमुख पुढाऱ्यांना परिषदेला बोलावण्यात आले, परंतु या परिषदेत केवळ दादासाहेब गायकवाड सोडल्यास दुसरे कोणीही प्रमुख पुढारी हजर नव्हते."[२१]

रिपब्लीकन पक्षाच्या ऐक्यास दलित नेतृत्वाचा स्वार्थ, अहंकार जबाबदार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपेक्षा त्यांनी निर्माण केलेल्या महान ध्येयापेक्षा स्वत:चे नेतृत्व स्वत:चे गट, अहंकार महत्त्वाचा वाटत होता. त्यामुळे ऐक्यात अडचणी येत होत्या. वरवर ऐक्याचा देखावा करायचा आणि आतून मात्र स्वार्थ जोपासल्यामुळे ऐक्य भंग पावत राहिले १९७४ ला बि.सी. कांबळे यांनी ऐक्य घडवून आणण्याचा प्रयत्न केला, पण तो अयशस्वी ठरला. १९८४ ला बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांचे निधन

झाले. दत्ता कट्टी हे खोब्रागडे गटाचे अध्यक्ष झाले. त्यांनी रिपब्लीकन पक्ष एकसंघ करण्याचा प्रयत्न केला.

"२० जानेवारी १९८५ साली नागपूर येथे जवळपास सर्व गटांच्या प्रमुखांची बैठक झाली. त्यांनी आपापले गट विसर्जित केल्याचे जाहिर केले. एकत्रित रिपब्लीकन पक्षाच्या अध्यक्षपदी दत्ता कट्टी यांची तर कार्याध्यक्षपदी रा.सु. गवई यांची निवड करण्यात आली."[२२]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नंतरच्या नेतृत्वानी रिपब्लीकन पक्ष स्थापन केला, पण दोन वर्षाच्या आतच पक्ष फुटला. गायकवाड कांबळे, खोब्रागडे, गवई, आठवले, कवाडे, आंबेडकर अशा विविध गटात हा पक्ष फुटत गेला. आज ५० गटात हा पक्ष विखुरला आहे. बाबासाहेबांनी निर्माण केलेल्या या अथांग महासागराचे अनेक नद्यात विसर्जन झाले आहे. १९८९ पर्यंत रिपब्लीकन ऐक्याचे पक्षांतर्गत गटबाजीचे राजकारण चालत राहिले.

"मुंबईतील चेंबूर भागात दलित सवर्ण संघर्ष पेटला होता. त्यामुळे पुन्हा एकदा रिपब्लीकन पक्ष एकत्रित करण्यासाठी काही तरुण कार्यकर्ते रिपब्लीकन ऐक्य झाले पाहिजे. या मागणीसाठी उपोषणाला बसले होते. पँथर संघटनेने देखील रिपब्लीकन नेतृत्वावर ऐक्यासाठी दबाव आणला. शेवटी १९ डिसेंबर १९८९ रोजी डॉ. आंबेडकर भवन दादर मुंबई येथे रिपब्लीकन गटाधिपती एकत्र आले. ऐक्यासाठी उपोषणाला बसलेल्या कार्यकर्त्यांच्या दबावाखाली रिपब्लीकन नेत्यांनी ऐक्याची घोषणा करणे आवश्यक बनले."[२३]

रिपब्लीकन पक्षाच्या अंतर्गत गटाबाजीच्या राजकारणाने पक्ष विविध गटात विभागला होता. रिपब्लीकन नेत्यांच्या नेतृत्वा विरोधी प्रतिक्रिया म्हणून दलित पँथर नामक तरुणांची आक्रमक धाडसी संघटना स्थापन केली, परंतु जी अवस्था रिपब्लीकन पक्षाची झाली तिच अवस्था कालांतराने दलित पँथरची झाली. नामदेव ढसाळ आणि

राजा ढाले यांच्यात वैचारिक मतभेद होऊन दलित पँथर ही विविध गटात विभागली गेली. म्हणून सत्ता, पद, प्रतिष्ठा, अहंकार, यामुळे दलित चळवळ ही दिशाहीन झाल्याचे दिसून येते. १९८९ च्या ऐक्यात रा.सु. गवई, बाळासाहेब आंबेडकर, रामदास आठवले, बी.सी. कांबळे, नामदेव ढसाळ, गंगाधर गाडे, टी.एम. कांबळे, राजा ढाले, अर्जून डांगळे, ज.वि. पवार उपस्थित होते. रामदास आठवले यांना एकत्रित रिपब्लीकन पक्षाचा निमंत्रक म्हणून निवडण्यात आले. या ऐक्यामुळे दलित जनतेत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. १९९० ला जनता दलाचे व्ही.पी.सिंग पंतप्रधान झाले होते. त्यांनी १९९१ हे वर्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जन्मशताब्दी वर्ष म्हणून साजरे केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तैलचित्र संसदेत लावले आणि जयंतीच्या दिवशी सुट्टी घोषित केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा गौरव म्हणून १९९१ मध्ये भारतरत्न हा सर्वात मोठा सन्मान मरणोत्तर प्रदान करण्यात आला.

"१९९० च्या विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेसशी युती करावी की, जनता दलाबरोबर युती करावी या मुद्यावरुन पुन्हा ऐक्य भंगले. श्री रा.सु. गवई आणि रामदास आठवले यांनी काँग्रेसशी युती करण्याचे ठरवले तर बाळासाहेब आंबेडकरांनी जनता दलाशी युती करण्याचा विचार केला. शेवटी युतीच्या कारणावरुन २२ जानेवारी १९९० ला पुन्हा एकदा पक्षात दोन गट पडले. त्यानंतर हळूहळू पूर्वीचे सर्व गट अस्तित्वात आले."[२४]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नंतरच्या नेतृत्वात वैचारिक मतभेद सत्ता संबंध, अहंकार, पद प्रतिष्ठा यामुळे दलित राजकीय चळवळ ही वेगवेगळ्या गटात विभाजित होत गेली. १९८९ च्या ऐक्याने दलित समाजात एक नवी राजकीय चेतना निर्माण केली होती, परंतु निवडणुकीतील युतीच्या कारणावरुन हे ऐक्य पुन्हा एकदा भंगले. दलित राजकीय नेतृत्वानी स्वतःच्या स्वार्थासाठी ऐक्य करणे आणि ऐक्य तोडणे यात त्यांना फारसे गांभीर्य वाटत नव्हते. स्वतःच्या राजकीय हितसंबंधावर ऐक्य आणि

युती अवलंबून होती. १९८९ चे ऐक्य तोडण्यात कोण जबाबदार आहे ? हा प्रश्न आहे, पण रामदास आठवले, रा.सु. गवई, बाळासाहेब आंबेडकर यांनी राजकीय हितसंबंधाला प्राधान्य देत आपला वेगळा मार्ग निवडला. रामदास आठवले यांनी १९९० मध्ये शरद पवारांच्या काँग्रेसशी युती करून महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात स्थान मिळवले. तर बाळासाहेब आंबेडकर यांनी जनता दलाशी युती करून राज्यसभेचे सदस्यत्व मिळवले होते. म्हणून १९५७ पासून ते आजतागायत दलित राजकीय नेतृत्व डॉ. बाबासाहेबांच्या राजकीय विचाराला, निष्ठेला, पक्षाला, प्राधान्य देण्याऐवजी राजकीय हित संबंधाला प्राधान्य दिल्याचे दिसून येते.

रामदास आठवले यांनी १९९० ते १९९९ पर्यंत काँग्रेसशी युती करून समाजकल्याण मंत्री पद आणि १९९८ च्या लोकसभा निवडणुकीत मुंबईतून लोकसभेचे प्रतिनिधित्व केले. १९९९ ते २००९ या काळात शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस सोबत युती करून पंढरपूर या आरक्षित मतदार संघातून दोनदा लोकसभेत प्रतिनिधित्व केले. २००९ ला राष्ट्रवादी काँग्रेसशी युती तोडून काँग्रेसशी युती केली.

२००९ मध्ये काँग्रेसशी युती करून शिर्डी मतदार संघातून लोकसभा निवडणूक लढवली. त्यात त्यांचा पराभव झाला. आपला पराभव म्हणजे दलित चळवळीचा पराभव आहे असे स्पष्ट करून २००९ च्या विधानसभा निवडणुकीत रिडालोस नावाचा प्रयोग केला. २००९ च्या विधानसभा निवडणुकीसमोर रिडालोसचे योग्य संघटन न झाल्यामुळे रामदास आठवले यांच्या पक्षाचा एकही सदस्य निवडून आला नाही. रिडालोसच्या अपयशानंतर रामदास आठवले यांनी शिवसेना भाजपा या पर्यायाची निवड करून महायुती केली. तात्पर्य रामदास आठवले यांचे नेतृत्व हे आपल्या राजकीय तत्वज्ञान, आंबेडकरी राजकीय विचारासह सत्ता संबंधाला अधिक प्राधान्य दिल्याचे दिसून येते.

रामदास आठवले यांनी रिपब्लीकन पक्षाच्या ऐक्यासाठी विविध कार्यक्रमांच्या

माध्यमातून आव्हान केले आहे. आजही रिपब्लीकन पक्षाच्या ऐक्यासाठी आपण तयार आहोत. आपला गट एकत्रित रिपब्लीकन पक्षात विलिन करून जनता निवडीला त्या नेत्याच्या नेतृत्वाखाली काम करण्यास तयार आहोत असे म्हणतात, परंतु दलित राजकीय नेतृत्व देखाव्यासाठी समाजाची दिशाभूल करण्यासाठी ऐक्याचा दावा करतात. रा.सु. गवई आणि रामदास आठवले यांना काँग्रेसशी युती केल्यामुळे बाळासाहेब आंबेडकर यांनी जनता दलाशी युती केली. रिपब्लीकन पक्षाचे ऐक्य करून तिसरी शक्ती निर्माण करावयाची असेल तर सर्व रिपब्लीकन प्रमुखांच्या गट नेत्यांना आपला अहंकार, स्वार्थ, मोह, मतभेदाचा त्याग करून सह्दयतेने आंबेडकरी विचार जोपासणारा प्रभावी रिपब्लीकन पक्ष निर्माण होऊ शकतो. रामदास आठवले यांच्या नेतृत्वानी सुरुवातीपासून ते आजही ऐक्याच्या बाजूने आहेत. कारण कोणत्याही एका जातीच्या किंवा गटाच्या जोरावर निवडणुकीतील यश संपादन करता येत नाही.रिपब्लीकन ऐक्याअभावी रिपब्लीकन पक्ष महाराष्ट्राच्या राजकारणात तिसरी शक्ती म्हणून निर्माण होण्यास अडथळा निर्माण होतांना दिसून येतो.

**५.३ बाळासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाचा विशेष अभ्यास :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतर बहुजन समाज दिशाहीन झाला. कारण बाबासाहेबांचे अकाली जाणे हा चळवळीवरचा मोठा आघात होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नंतरच्या काही दलित राजकीय नेतृत्वानी राजकीय स्वार्थासाठी रिपब्लीकन पक्ष काँग्रेसच्या दावणीला बांधला. रिपब्लीकन पक्षाच्या स्थापने संदर्भातील खूल्या पत्रावर आधारित रिपब्लीकन पक्षाची सातत्याने शकले पडत गेली. विखुरलेल्या दलित राजकीय नेत्यांना एकत्र करण्याचा प्रयत्न भैय्यासाहेब आंबेडकर यांच्याकडून झाला, परंतु भैयासाहेबांच्या या कार्यामुळे आपले पुढारीपण संपुष्टात येते की, काय अशी भिती बाळगून तत्कालीन काँग्रेसनिष्ठ दलित राजकीय नेत्यांनी भैयासाहेबांना सातत्याने डावलण्याचा प्रयत्न केला. दुर्दैवाने भैयासाहेबांचे

अकाली परिनिर्वाण झाले आणि पुन्हा एकदा दलित समाज स्वार्थी दलित नेत्यांच्या तावडीत सापडला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतर त्यांच्या संकल्पनेतील रिपब्लीकन पक्ष स्थापन झाला आणि अवघ्या दोन वर्षातच पक्ष हा विखुरला गेला. रिपब्लीकन पक्षाच्या अकार्यक्षमतेची राजकीय पोकळी भरुन काढण्याचे काम १९७४ मध्ये दलित पँथरने केले. दलित पँथरच्या माध्यमातून दिशाहीन झालेल्या चळवळीला काही काळ दिशादर्शन करण्याचे काम दलित पँथरने केले. दलित पँथर ही दलित जनतेसाठी आशेचा किरण वाटत होती. दलित पँथरही कालांतराने अंतर्गत वैचारिक मतभेदातून फुटला अशी सामाजिक राजकीय स्थित्यंतरे घडत होती. यातून महाराष्ट्रात दलित समाजावर अन्याय अत्याचाराचे प्रमाण वाढत होते.

समाजाची वाटचाल दिशाहीन अवस्थेकडे होत असतांना बाळासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाचा उदय झाला. रिपब्लीकन पक्ष हा एक जातीय पक्ष बनला होता. ही एक जातीय ओळख मिटवण्यासाठी समाजातील शोषित, पीडित , दलित, शेतकरी, आदिवासी बहुजनांना संघटित करण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्रातील दलित समाजाबरोबर आदिवासी बहुजनांना संघटित करण्यासाठी भा.रि.प. बहुजन महासंघाची स्थापना केली. बाळासाहेब आंबेडकर यांनी भारिप बहुजन महासंघाच्या माध्मयातून स्वबळावर अकोला पॅटर्नच्या माध्यमातून स्वतंत्र राजकीय प्लॅटफॉर्म तयार केला. बाळासाहेब आंबेडकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर आधारित भारिप बहुजन महासंघाची बांधणी करून महाराष्ट्रात स्वबळावर पक्षाची ताकद निर्माण केली.

समाजातील बुध्दिजीवी, उच्चविद्या विभूषित, कर्मचारी वर्गांना पक्ष कार्यात सामील करून अल्पावधीतच महाराष्ट्राच्या राजकारणात स्वतंत्र ओळख निर्माण केली. बाळासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाने दलित आदिवासी, बहुजनांना एकत्र करून राजकीय

अस्तित्व नसलेल्या माणसाला राजकारणात अस्तित्व निर्माण केले. माझा पक्ष सत्ताधारी पक्ष ही भूमिका घेऊन अभिमानाने बोला, अभिमानाने सांगा, भिक नको सत्तेची सत्ता हवी हक्काची असा नारा दिला. बाळासाहेब आंबेडकर यांनी आपल्या राजकीय कार्यातून निष्कलंक, दुरदृष्टी, अभ्यासू वैचारिक नेतृत्व म्हणून स्वतंत्र ओळख निर्माण केली. भारिप बहुजन महासंघाच्या माध्यमातून अन्य जातींना सोबत घेऊन जातीबाहेर मतांचे आदान प्रदान त्यांनी सुरु केले.

१९९५ च्या विधानसभा निवडणुकीत बहुजन श्रमिक आघाडी स्थापन करून १२३ उमेदवार उभे केले होते. त्यातील ११ उमेदवारांना दुसऱ्या क्रमांकची २३ उमेदवारांना तीन नंबरची मते मिळाली. तीन उमेदवार विजयी झाले होते. त्यामुळेच १९९५ ला शिवसेना - भाजपा युतीला सत्ता हस्तगत करणे सोपे झाले. बाळासाहेब आंबेडकर यांनी १९९९ मध्ये भारिप बहुजन महासंघाचे एकत्रिकरण होऊन भारिप बहुजन महासंघ स्थापन झाला. बाळासाहेब आंबेडकर यांनी अकोला मतदार संघातून सतत दोनदा संसदेत प्रतिनिधित्व केले. २००४ , २००९, २०१४ या तिन्ही लोकसभा निवडणुकीत सतत पराभव झाला. बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वातील भारिप बहुजन महासंघाचे जातीच्या परिघाबाहेर नेणारी चळवळ निर्माण केली आहे.

### ५.३.१ बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली भारिप बहुजन महासंघाची संघटनात्मक बांधणी :

बाळासाहेब आंबेडकर यांनी १९८२ पासून राजकारणात सक्रिय झाले. मरगळ आलेल्या दलित राजकीय चळवळीला नव संजीवनी देण्याचे काम बाळासाहेब आंबेडकर यांनी केले. एक जातीय बनलेल्या रिपब्लीकन पक्षाला सर्व समावेशक व सर्व जातीय पक्ष बनवण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारानुसार भारतीय रिपब्लीकन पक्षाला बहुजन महासंघाची जोड दिली. यातून बाळासाहेब आंबेडकर

यांनी दलित, आदिवासी, बहुजनांना, संघटित करून अल्पावधीतच भारिप बहुजन महासंघाने महाराष्ट्राच्या राजकारणात स्वतंत्र ओळख निर्माण केली. भारतीय रिपब्लीकन पक्षाची स्थापना करतांना बाळासाहेब म्हणाले, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेला खराखुरा रिपब्लीकन पक्ष उभारण्याचा आपण निर्धार करत आहोत."

या देशातील राजकारणावर सरंजामदार व श्रीमंताची घट्ट पकड आहे. येथे दलित श्रमिकांना कोणतेही राजकीय अस्तित्व नाही. या बहुसंख्याकांची सत्ता प्रस्थापित करण्यासाठी आपण रिपब्लीकन पक्षाची पूनर्बांधणी करत आहोत. सद्याचे एका जातीचे राजकारण ठोकरून आपण सर्व समावेशक वृत्तीने सर्व तळागाळातील समाजाला एकत्रीत करू. आर्थिकदृष्ट्या दूर्बल समुहांना बरोबर घेऊन केवळ मीपणाच्या वल्गना न करता विचार आणि वृत्तीने सर्व जनतेचे राजकारण करून तुकड्याचे व लाचारीचे राजकारण न करता पोलीदी वृत्तीने संपूर्ण सत्ताच ताब्यात घेण्यासाठी लढून, या देशातील सर्व राष्ट्रीय प्रश्नांकडे देशहिताच्या दृष्टीने पाहून देशाचे नेतृत्व करणारा पक्ष निर्माण करीत आहोत."[२५]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील सर्व जातींना, धर्मियांना सामावून घेणारा पक्ष स्थापन करून त्या पक्षास आंबेडकरी विचारांचे अधिष्ठाण प्राप्त करून दिले. एक जातीय पक्षाऐवजी सर्वसमावेशक चेहरा पक्षास प्राप्त करून दिला. भारिप च्या माध्यमातून दलित जनतेच्या मनात एक प्रकारचे आत्मभान निर्माण करून चळवळीस गतिमान करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वानी केले आहे. रिपब्लीकन पक्षाची पूणर्बांधणी करून तडजोडीच्या राजकारणा ऐवजी तात्विक राजकारणाची सुरुवात करून आंबेडकरी विचारांचे दर्शन घडवले. बाळासाहेब आंबेडकर या नेतृत्वाने भारिप बहुजन महासंघाची स्थापना करून पक्षाची विचारधारा, कार्यक्रम ग्रामीण भागापर्यंत पोहचवण्यासाठी पक्षाची मजबूत संघटनात्मक बांधणी केली. बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वातील भारिप बहुजन महासंघाच्या शाखा स्थानिक पातळीपासून

ते राज्यस्तरीय पातळीपर्यंत आहेत. पक्षाची संघटनात्मक बांधणी ही पक्षाचा पाया असतो. या मजबूत पायावरच पक्ष भक्कमपणे उभा असतो.

संघटनेतील कार्यकर्ता हा प्रशिक्षित आहे. म्हणून बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वातील पक्ष cadere base party आहे. पक्षाच्या संघटनेत जे पदाधिकारी आहेत. त्यांना पक्ष राजकीय प्रशिक्षण देऊन प्रशिक्षित करतो. पक्षाच्या यशस्वीतेसाठी कार्यकर्ता हा प्रशिक्षित असणे महत्त्वाचे असते. पक्षाचा कार्यकर्ता हा निष्ठावान असावा लागतो. निष्ठावान कार्यकर्त्यावरच पक्षाचे आणि पक्ष नेतृत्वाचे राजकीय भवितव्य अवलंबून असते.

**५.३.२ भारिप बहुजन महासंघाची कार्यकारिणी :**

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १. | बाळासाहेब आंबेडकर | राष्ट्रीय अध्यक्ष |
| २. | एल.डी. भोसले | उपाध्यक्ष |
| ३. | मोहन साबळे | उपाध्यक्ष |
| ४. | रणजित मेश्राम | सल्लागार समिती |
| ५. | प्रा. अविनाश डोळस | सदस्य राज्य व्यवहार समिती |
| ६. | एस.के. जोगदंड | सल्लागार |
| ७. | मा. आ. हरिदास भदे | सदस्य राज्य व्यवहार समिती |
| ८. | ज.वि. पवार | केंद्रिय कार्यालय प्रमुख |
| ९. | प्रभाकर डांगळे | केंद्रिय कार्यालय प्रमुख |
| १०. | मनोहर सोनवणे | जनसंपर्क अधिकारी |

भारिप बहुजन महासंघाच्या घटनेप्रमाणे पक्षाची संघटनात्मक रचना पुढील प्रमाणे आहे.

१. केंद्रिय समिती

२. विभागीय समिती

३. जिल्हा समिती / महानगर समिती

४. तालुका समिती / नगरपालिका शाखा / शहर शाखा

५. ग्राम समिती / वार्ड शाखा

वरील पाचस्तरीय पध्दती पक्षाच्या संघटनात्मक रचना स्वीकारण्यात आली आहे.

**अ) केंद्रिय समिती :**

राज्य पातळीवर काम करण्यासाठी पक्षाची समिती महत्त्वाची समिती म्हणून केंद्रिय समिती काम करते. या समितीत पक्षाचा अध्यक्ष, उपाध्यक्ष, सरचिटणीस, सचिव, कोषाध्यक्ष, संघटक व कार्यकारीणीतील सदस्य इत्यादींचा समावेश असतो. ही समिती पक्षाची ध्येयधोरणे, कार्यक्रम, दिशा ठरवते. राष्ट्रीय व राज्य स्तरावरील आंदोलनाचे, कार्यक्रमाचे नियोजन करते. सार्वत्रिक निवडणुकीच्या काळात पक्षाचा जाहिरनामा, पक्षाचे अधिकृत उमेदवार निश्चित करते. पक्षाचे उमेदवार जास्तीत जास्त प्रमाणात निवडून येण्यासाठी योग्य ती रणनीती तयार करण्याचे कार्य ही समिती करते.

**ब) विभागीय समिती :**

राज्यातील विविध विभागात पक्षाची कार्य प्रभावीपणे करण्यासाठी विभागवार विभागीय समित्या निर्माण केल्या आहेत. विदर्भ विभाग, मराठवाडा विभाग, पश्चिम महाराष्ट्र विभाग, उत्तर महाराष्ट्र विभाग, कोकण विभाग, मुंबई विभाग अशा सहा विभागाची निर्मिती करण्यात आली आहे. या विभागीय स्थितीत अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, संघटक, कोषाध्यक्ष इत्यादी पदाधिकारी असतात.

विभागीय समिती त्या- त्या विभागातील प्रश्ना संदर्भात पक्षाची भूमिका दिशा ठरवतात. विविध समस्यांवर आंदोलने, परिषदा, मेळावे, शिबिरांचे आयोजन

करणे, विभागीय समिती विभागीय पातळीवर पक्षाच्या बांधणीचे कार्य पार पाडते.

**क) जिल्हा समिती / महानगर समिती :**

राज्यातील सर्व जिल्ह्यामध्ये जिल्हा समिती स्थापन करण्यात आली आहे. जिल्हा समिती जिल्ह्यातील विविध राजकीय प्रश्नांवर, समस्यांवर, पक्षाची भूमिका ठरवून आंदोलनाची दिशा ठरवते, केंद्रिय समितीने दिलेल्या आदेशाचे, सुचनांचे पालन करणे, जिल्ह्यात पक्षवाढीस प्रयत्न करणे, जिल्हा समिती / महानगर समितीत अध्यक्ष, उपाध्यक्ष, संघटक सरचिटणीस, कोषाध्यक्ष, सचिव, प्रसिध्दी प्रमुख १०, जिल्हा कार्यकारीणी सदस्य असतात.

**ड) तालुका समिती / नगर पालिका शाखा / शहर शाखा :**

राज्यातील सर्व तालुक्यामध्ये तालुका समिती निर्माण करण्यात आल्या आहेत. तालुक्यातील विविध राजकीय प्रश्नावर, आंदोलनाची, निदर्शनाची, मोर्चाची दिशा ठरवणे, स्थानिक पातळीवरील प्रश्न सोडवण्यास प्राधान्य देणे, स्थानिक प्रश्नांसंबंधी तहसिलदार, उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देणे. जिल्हा समितीने दिलेल्या सुचनांचे आदेशाचे पालन करून त्या अंमलात आणण्याचे कार्य तालुका समिती पार पाडते. तालुका समितीत अध्यक्ष, उपाध्यक्ष, संघटक, सरचिटणीस, सचिव, कोषाध्यक्ष प्रसिध्दी प्रमुख १०, कार्यकारीणी सदस्य इत्यादी पदाधिकाऱ्यांचा समावेश असणे. तालुका समितीप्रमाणेच नगर पालिका शहरशाखा समितीची रचना असते.

**इ) ग्रामसमिती / वार्ड शाखा :**

राज्यातील सर्व तालुक्यातील गावात ग्रामसमिती अस्तित्वात आहेत. ग्रामसमितीत अध्यक्ष, उपाध्यक्ष, सरचिटणीस, कोषाध्यक्ष, संघटक आणि कार्यकारीणी सदस्य असतात.

ग्रामसमिती गावातील नागरिकांचे स्थानिक प्रश्न स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत सोडवण्याचे कार्य पार पाडते. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वातील भारिप बहुजन

महासंघाच्या संघटनात्मक बांधणीतील सर्वात शेवटची समिती आहे. ग्रामसमितीत तालुका, जिल्हा समित्यांनी दिलेल्या आदेशांचे सुचनांचे पालन करण्याचे कार्य पार पाडते. भारिप बहुजन महासंघाच्या ग्रामसमिती महाराष्ट्रातील सर्व गावामध्ये स्थापन झाल्या आहेत. पक्ष संघटनेची बांधणी ही महाराष्ट्रातील सर्व गावापासून ते राज्य पातळीपर्यंत आहे. संघटनात्मक बांधणी मजबूत असल्यामुळे पक्षाची पाळेमुळे ग्रामीण भागात चांगल्या पध्दतीने रुजली आहेत. गेल्या तीन लोकसभा निवडणुकीत पक्षाला एकही जागा जिंकता आली नसली तरी पक्षांच्या मतांची टक्केवारी वाढते आहे. पक्षाच्या नेतृत्वाने महाराष्ट्रातील जनतेचा जनसंपर्क वाढवला पाहिजे. दलितांच्या प्रश्नांवर संघर्ष करून त्या सोडवण्यावर भर दिल्यास पक्षास त्याचा अधिक फायदा होईल. लोकसभेतील तीन निवडणुकांत एकही सदस्य निवडून आला नसला तरी विधानसभा निवडणुकीत सतत एक किंवा दोन सदस्य स्वत:च्या बळावर निवडून आणण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. याशिवाय अकोला जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था शहरी आणि ग्रामीण भागावर पक्षाचे वर्चस्व असल्याचे दिसून येते.

**५.४ बाळासाहेब आंबेडकर यांचा राजकीय आणि आर्थिक कार्यक्रम :**

बाळासाहेब आंबेडकर यांनी १९८० च्या दशकात राजकारणात सक्रिय सहभाग घेतला. दिशाहीन आणि मरगळ प्राप्त झालेल्या दलित राजकीय चळवळीला पक्षाच्या माध्यमातून नव संजीवनी देण्याचे कार्य केले. बाळासाहेबांनी दलित शोषित शेतकरी, शेत मजूरांच्या प्रश्नाबाबत निर्णायक भूमिका घेऊन भूमिहिन आंदोलन, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना योग्य भाव मिळाला पाहिजे. यासाठी लॉंग मार्च, कापसाला योग्य भाव मिळावा यासाठी विदर्भातील चक्काजाम आंदोलन, मंडल आयोगाच्या अंमल बजावणीसाठी आंदोलन, गरिबांना स्वस्त दरात विज मिळावी यासाठी एन्रॉन प्रकल्पाला विरोध करून सामान्य जनतेच्या हितासाठी व्यापक असा लढा उभारला. बाळासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक आंदोलनातून निष्कलंक, दुरदृष्टीपणा, अभ्यासू व्यक्तिमत्व,

व्यक्तिनिष्ठ राजकारणापेक्षा तत्वनिष्ठ राजकारणी, माझा पक्ष सत्ताधारी पक्ष अशी भूमिका घेऊन वाटचाल करणारे नेतृत्व म्हणून पुढे आले आहे.

कोणत्याही राजकीय नेतृत्वास राजकीय वाटचाल करीत असतांना विशिष्ट अशी राजकीय सामाजिक, आर्थिक भूमिका घेऊन वाटचाल करावी लागते. नेतृत्वाच्या राजकीय आणि आर्थिक कार्यक्रमाच्या आधारे राजकीय नेतृत्व जनमत संघटित करीत असते. राजकीय आणि आर्थिक कार्यक्रमाच्या आधारे नेतृत्वाचा जनाधार वाढतो. राजकीय नेतृत्वास व्यापक असा जनाधार प्राप्त झाला की, नेतृत्वाचा प्रभाव निर्माण होतो. राजकीय आणि आर्थिक कार्यक्रमाच्या प्रभावशीलतेवर नेतृत्वाचा प्रभाव अवलंबून असतो. म्हणून समकालीन जनतेच्या राजकीय आणि आर्थिक इच्छा, आकांक्षा अपेक्षा गरजा काय याचे आकलन करून कार्यक्रम निर्धारित करावा लागतो.

बाबासाहेब आंबेडकर यांनी परंपरागत भूमिका न घेता त्यांनी समकालीन नागरीकांच्या मूलभूत राजकीय आणि आर्थिक गरजा काय आहेत याचे अभ्यास पूर्वक विश्लेषण करून नाविण्यपूर्ण, बहुजनांच्या विकासास प्राधान्य देणारा राजकीय आर्थिक कार्यक्रम निर्माण केला.

**५.४.१ बाबासाहेब आंबेडकर यांचा राजकीय कार्यक्रम :**

लोकशाही राजकीय व्यवस्थेत सर्वांचा सक्रिय सहभाग अपेक्षित असतो, परंतु प्रत्यक्षात दलित, शोषित, वंचित समाज हा राजकीय सत्ता सहभागापासून वंचित राहिला. समाजातील सर्व लोकांना राजकारणात सहभाग मिळाला पाहिजे, सत्तेचे केंद्रीकरण न होता तिचे सामाजिक अभिसरण झाले पाहिजे. ही भूमिका बाळासाहेब आंबेडकर यांची आहे.

"आधुनिक जगातील लोकशाही मूल्यांमध्ये व्यक्ती हा केंद्रबिंदू असला तरी राजकीय व्यवस्था ध्येयाप्रती जाऊ शकत नाही. सत्तास्थानी असणारे लोक हे बहुसंख्यांक

वर्गाचे असल्यामुळे अल्पसंख्यांक नेहमीच सत्तेपासून वंचित राहिला आहे. राजकीय व्यवस्थेत सर्वच वंचित वर्गाला प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे. पक्ष सत्तेतील भागीदारीसाठी प्रयत्नशील राहिल व त्यांचे पुरेसे प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे. न्यायव्यवस्था सुदृढ आणि गतिमान करण्यासाठी न्यायव्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवून आणणे. सर्वांसाठी समान न्याय विनाविलंब मिळाला पाहिजे. कायदा सुव्यवस्था प्रभावी अंमलात आणणे. अ. जाती जमाती आणि धार्मिक अल्पसंख्यांकावरील अन्याय अत्याचार थांबवणे. समाजजीवनात स्वातंत्र्य, समता, आणि बंधुभाव प्रस्थापित करणे. सुरक्षा व्यवस्थेतील जातीयतेचे निर्मूलन करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर पोलिस आयोगाची निर्मिती करणे."[२६]

बाळासाहेब आंबेडकर यांनी सत्तेपासून वंचित असणाऱ्या समुहांना सत्ता सहभाग मिळवून देणे, कायद्याचे राज्य निर्माण करण्यासाठी, न्याय पारदर्शक गतिमान विनाविलंब सर्व जाती जमातींना मिळाले पाहिजे. यासाठी सर्व समावेशक राजकीय भूमिका घेतली. स्वातंत्र्य समता, बंधुता, न्याय या मानवी मूल्यांच्या आधारे संविधान केंद्रित समाजव्यवस्था निर्माण करण्याचा कार्यक्रम बाळासाहेब आंबेडकर यांचा आहे.

राजकीय कार्यक्रमाच्या माध्यमातून बाळासाहेब आंबेडकर यांनी लहान लहान समुहांच्या हातात सत्ता दिली. अकोला जिल्ह्यातील जिल्हा परिषद आणि सात पंचायत समित्या भारिप बहुजन महासंघाच्या ताब्यात आहेत. मुस्लीम, तेली जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी पंचायत समिती भारिप बहुजन महासंघाच्या ताब्यात आहेत. मुस्लीम, तेली, माळी, बंजारा, धनगर, महादेव कोळी, भिल्ल, टाकणखार, बौध्द या समाजातील व्यक्तींना जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी पंचायत समितीच्या सभापती विराजमान केले. हे राजकीय परिवर्तन बाळासाहेबांच्या नेतृत्वानी करून दाखवले आहेत. अ. जाती जमाती आणि अल्पसंख्याकावरील अन्याय अत्याचार रोखण्यासाठी संसद आणि संसदेबाहेर परखड विचार व्यक्त केले आहेत. सन २००५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने शैक्षणिक संस्थामधील अ. जाती. जमातींना उच्च शिक्षणात व्यावसायिक

अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक आरक्षण राहणार नाही. हा निर्णय दिला होता. या निर्णयाच्या विरोधात १ सप्टेंबर २००५ मध्ये बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली मुंबई उच्च न्यायालयावर मोर्चा काढण्यात आला होता.

जागतिक वंशवार विरोधी मोहिमेत सहभागी होण्यासाठी दक्षिण आफिक्रेच्या दरबान शहरात उपस्थित राहून भारतातील जाती भेदभावांचा प्रश्न मांडला. शाळेतील मुलांच्या टि.सी. वर जातीची नोंद करण्यात येऊ नये आणि अ.जाती. अ.जमातीचे राजकीय आरक्षण रद्द करण्याचा परखड विचार मांडला. यातून बाळासाहेब आंबेडकर यांना जातिविहीन समाज निर्माण करण्याची भूमिका दिसून येते. बाळासाहेब आंबेडकर यांनी संसद सदस्य असतांना विशिष्ट अल्पसंख्यांक समुहाला लक्ष करण्यासाठी तत्कालीन रालोआ सरकारने पोटा कायदा पास केला होता. पोटा कायदा कसा अल्पसंख्यांक विरोधी आहे. ही भूमिका मांडण्यासाठी पोटा विरोधी जाहिर परिषद घेतल्या. "खासदार बाळासाहेब आंबेडकरांनी खासदार बनातवाला या मुस्लीम प्रतिनिधीस सोबत घेऊन यवतमाळ परभणी या ठिकाणी जाहिर पोटा विरोधी परिषदा घेतल्या. लाखो लोकांच्या उपस्थित पोटा कायद्याचे दुष्परिणाम जाहिर केले."[२७]

**५.४.२ बाळासाहेब आंबेडकर यांचा आर्थिक कार्यक्रम :**

बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील भारिप बहुजन महासंघाला अन्य राजकीय पक्षाला पर्याय देऊन पक्षाचा प्रभाव वाढवण्यासाठी दलित आदिवासी बहुजनांच्या आर्थिक उन्नतीसाठी आर्थिक कार्यक्रम निर्माण करणे महत्त्वाचे होते. "समाजातील बेकार तरुणांना उद्योग धंद्यासाठी मार्गदर्शन करणे, पारंपरिक उद्योग धंद्यातून उत्पादित केल्या जाणाऱ्या वस्तुस योग्य भाव मिळवून देणे, शेती व्यवसायात आधुनिक तंत्रज्ञान वापरण्यासाठी योग्य मार्गदर्शन करणे, अल्पभूधारकांना शासन आर्थिक सवलती देत असतांना या सवलती अनेकापर्यंत पोहचू दिल्या जात नाहीत. याचा शोध घेऊन अडथळे दूर करणे आदी कार्यक्रम व्यापक प्रमाणात हाती घेणे गरजेचे आहे."[२८]

राजकीय नेतृत्व आपल्या राजकीय आणि आर्थिक कार्यक्रमाच्या माध्यमातून संघटनात्मक कार्यास गती देते. संघटनात्मक बांधणीच्या माध्यमातून नेतृत्वास जनाधार प्राप्त होतो. जनाधाराच्या माध्यमातून राजकीय नेतृत्व आपला राजकीय प्रभाव निर्माण करतो. म्हणून नेतृत्वाच्या राजकीय आणि आर्थिक कार्यक्रमावर नेतृत्वाचा प्रभाव अवलंबून असतो.

बाळासाहेब आंबेडकर यांनी पक्षाची संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यासाठी सर्व समावेशक असा आर्थिक कार्यक्रम तयार केला. "मानवाच्या मूलभूत अधिकारामध्ये निवारा अत्यंत महत्त्वाचा आहे. शहर आणि खेड्यातील प्रत्येक नागरिकांना ५५० चौरस फुटाचे घर आवश्यक आहे. या आवश्यकतेच्या पूर्ततेसाठी सरकारी गृह संस्थावर भर देऊन त्यांना अत्यल्प व्याजदराने कर्ज मिळवून देणे, औद्योगीकरणाच्या माध्यमातून संमत्तीने न्याय वितरण करणे, ग्रामीण भागात पायाभूत सुविधांची उपलब्धता निर्माण करून सर्वांगिण विकास करणे, शेती व्यवसायात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी गुंतवणूक वाढवणे, जंगल ही एक संपत्ती आहे व तिचे वाटप जंगलातील रहिवाशांनाच करण्यात यावे, आदिवासीचे जीवनमान उंचावण्यासाठी व त्यांना मुख्य प्रवाहात सामावून घेणे, जलसंपत्तीचे नियोजनबध्द वापर करणे जमीनदारी पध्दत नष्ट करणे, वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे, लहान उद्योग धंद्यांना संरक्षण देणे, जास्तीत जास्त जमिनी पाण्याखाली आणून शेती उत्पादन वाढीस लावणे, लहान शेतकऱ्यांना पाटबंधाऱ्यांच्या आधारे पाणी पुरवठा करणे."[२९]

बाळासाहेब आंबेडकर यांनी दलित, शोषित, शेतकरी, शेतमजूर, कामगारांच्या आर्थिक जीवनाशी निगडित असलेले ज्वलंत प्रश्नावर अभ्यासपूर्वक चिंतन करून आर्थिक कार्यक्रम तयार केला आहे. बहुजनांच्या विकासाबरोबर राष्ट्राच्या आर्थिक, औद्योगीक जडणघडणीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या उर्जा, पाणी, आरोग्य, विज्ञान तंत्रज्ञान, शेती आणि पायाभूत सुविधा या सारख्या घटकांवर अभ्यासपूर्वक

चिंतन करून भूमिका स्पष्ट केली. बाळासाहेब आंबेडकर यांनी हा आर्थिक कार्यक्रम तयार केला नाही तर त्यांचा प्रत्यक्षात अंमलही केला. सर्वसामान्य माणसाला स्वस्तात वीज मिळावी यासाठी एन्रॉन प्रकल्पाला कडाडून विरोध केला. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या उत्पादनाला योग्य हमी भाव मिळावा यासाठी आंदोलने केली. विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या कापसाला योग्य भाव मिळावा यासाठी चक्काजाम आंदोलने केले. ग्रामीण भागातील बेरोजगार होतकरू तरुणांना उद्योजक बनवण्याचा उपक्रम सुरु केला आहे. या उपक्रमास चांगला प्रतिसाद मिळत आहे. बहुजन समाजाच्या हाती राजकीय सत्ता सोपवण्यासाठी पहिल्यांदा तो आर्थिकदृष्ट्या सक्षम बनला पाहिजे. या भूमिकेतून 'गाव तिथे उद्योग' हा उपक्रम सुरु केला. बहुजन समाजाच्या हाती आर्थिक सत्ता निर्माण झाली की, राजकीय सत्ता सहज प्राप्त करता येते. कारण राजसत्ता ही अर्थसत्तेच्या अधीन असते. बहुजन समाजाला राजकारणात सत्तेचा न्याय वाटा मिळवून देण्यासाठी बाळासाहेब आंबेडकरांची राजकीय वाटचाल चालू आहे.

"राज्यघटनेत राजकीय सत्ता आणि आर्थिक सत्ता एकमेकांच्या हातात हात घालून चालली पाहिजे असे म्हटले आहे. त्याला अनुसरुन सरकारने संमिश्र अर्थव्यवस्था आणली. आताच्या स्थितीत सत्ता आणि आर्थिक सत्ता यांच्यात विभाजन घडवून आणले जात आहे. राजकीय सत्ता सर्व सामान्याकडे जाऊ लागली आहे. ते बघून सत्तेमधील सवर्णाला वाटू लागले की, राजकीय सत्ता आपल्याला मिळणे अशक्य आहे. ते पाहुण राजकीय सत्ता व आर्थिक सत्ता यामध्ये विभाजन घडविण्याचे प्रयत्न केले जात आहे. सार्वजनिक उद्योग आहेत. तोपर्यंत राजकीय सत्ता व आर्थिक सत्ता हातात हात घालतील. जेव्हा सर्व खाजगीकरण होईल तेव्हा आर्थिक सत्तेचे केंद्र केवळ विधानभवन आणि लोकसभा राहील. राजकीय सत्तेला आर्थिक सत्तेची जोड नसेल तर काही अर्थ राहत नाही. खाजगीकरण हा सवर्णाचा डाव आहे. राजकीय सत्ता गेली तरी चालेल; परंतु आर्थिक सत्ता जाऊ नये."[३०]

बाळासाहेब आंबेडकर यांनी राजकीय सत्तेपेक्षा आर्थिक सत्तेला महत्त्वपूर्ण स्थान दिले आहे. बहुजनांच्या हाती आर्थिक सत्ता निर्माण व्हावी यासाठी त्यांनी आपल्या आर्थिक कार्यक्रमाच्या माध्यमातून गाव तिथे उद्योग नावाचा अभिनव उपक्रम सुरु केला आहे. १९९१ नंतर राजकीय आणि आर्थिक व्यवस्थेत आमूलाग्र बदल झाले. भारताने आपली अर्थव्यवस्था खूली केली. १९९१ नंतर राजकीय आरक्षणाच्या माध्यमातून राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण झाले. यामुळे राजकीय सत्ते ऐवजी आर्थिक सत्तेला महत्त्व प्राप्त झाल्याचे दिसून येते.

**५.५ बाळासाहेब आंबेडकरांची वैचारिक दिशा :**

राजकीय नेतृत्वास स्वतंत्र अशी वैचारिक दिशा असते. वैचारिक दिशेच्या आधारे नेतृत्व राजकीय चळवळीस योग्य दिशादर्शन करते. प्रत्येक राजकीय नेतृत्वाकडे स्वतंत्र अशी राजकीय विचारधारा असते. विचारधारेच्या आधारे नेतृत्व आपली वेगळी ओळख निर्माण करते. राजकीय नेतृत्वाकडे असलेल्या विचारधारेमुळे कार्यकर्ता हा आकर्षित होतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या घराण्याचा वैचारिक वारसा घेऊन बाळासाहेब आंबेडकर १९८० च्या दशकात राजकारणात सक्रिय झाले. महाराष्ट्रातील महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या परिवर्तनवादी मानवतावादी विचारांचा स्वीकार करून त्यांच्या विचारांना समाज व्यवहारात अस्तित्व प्राप्त करू न देण्याचा प्रयत्न करणारे नेतृत्व आहे.

महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा घेऊन जातिविहीन, समतामूलक समाज निर्माण करण्याचे ध्येय बाळासाहेब आंबेडकर यांचे आहे. यासाठी बाळासाहेब आंबेडकर यांनी जातीविषयी भूमिका मांडतांना शाळेच्या दाखल्यावरुन जात हद्दपार झाली पाहिजे. जाती जमातींना मिळणारे राजकीय आरक्षण रद्द झाले पाहिजे असे मत व्यक्त केले. राजकीय आरक्षण नाकारण्यापाठीमागे आवश्यकता नसणारे लोक या आरक्षणाचा फायदा घेतात. त्या

समाजातील सर्व सामान्यांना त्याचा फायदा होत नाही. राजकीय आरक्षण सामान्य माणसासाठी नसेल तर ते रद्द झाले पाहिजे. अशी भूमिका बाळासाहेब आंबेडकर घेतात. जातीअंताचा विचार परखडपणे मांडून बाळासाहेब आंबेडकर यांनी एक नवा क्रांतिकारी विचार मांडला.

जातीअंताच्या विचाराबाबत बाळासाहेब आंबेडकर म्हणाले "आपल्या देशाला प्रबोधनाला सामाजिक चळवळीचा वारसा लाभला आहे. अनेक महापुरुषांनी जाती निर्मूलन हा आपल्या चळवळीचा केंद्रबिंदू मानला होता. आपल्या देशात सुमारे दोनशे वर्षापेक्षा अधिक काळ जात या विषयावर विचारमंथन होत आहे. जातीव्यवस्था संपावी आणि सामाजिक जीवनात मानवता प्रस्थापित व्हावी. हा या सामाजिक चळवळीचा उद्देश होता."[३१]

बाळासाहेब आंबेडकर जातीअंताचा क्रांतिकारी विचार मांडून परिवर्तनवादी महामानवांच्या विचारांचा वारसा पुढे चालवत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राजकीय आरक्षणाची तरतूद १० वर्षाकरिता केली होती, परंतु नंतर शासनाने आपल्या राजकीय स्वार्थासाठी आरक्षणाची मुदत ही दर १० वर्षांनी वाढवली आहे. बाळासाहेबांच्या या विचारातून महामानवांचा मानवतावादी विचार प्रतिबिंबित होतो.

बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वांनी परंपरागत भावनिक राजकारणापेक्षा वास्तविक राजकारणाला प्राधान्य दिले आहे. भावनिक राजकारणाबाबत बाळासाहेब आंबेडकर म्हणतात, "भावनिक प्रश्नांचे भांडवल करून कोणताही प्रश्न सुटत नाही. गवई ते मायावती हे भावनिक राजकारण करीत आहेत. चळवळीला भावनिक किनार असावी याबद्दल आमचे दुमत नाही, परंतु ही भावनिकता किती तानावी यांचेही भान ठेवायला हवे. जो भावनिकतेला वास्तवाची जोड देऊ शकतो तोच समाजाचा आर्थिक विकास घडवू शकतो."[३२]

बाळासाहेब आंबेडकर यांनी रिपब्लीकन नेत्यासारखे फक्त भाविनक राजकारण

केले नाही. त्यांच्या राजकारणास भाविनकतेबरोबर वास्तविक राजकारणाची जोड आहे. दलित राजकीय चळवळींनी भावनिक राजकारण केल्यामुळे चळवळीला व्यापक असा आपला प्रभाव निर्माण करता आला नाही. म्हणून बाळासाहेब आंबेडकर यांचे नेतृत्व हे भावनिक राजकारणाबरोबर वास्तविक राजकारण करते. त्यामुळे त्यांनी स्वबळावर निवडणुका लढवून अकोला पॅटर्नच्या माध्यमातून स्वतंत्र राजकीय अस्तित्व निर्माण केले.

बाळासाहेब आंबेडकर या नेतृत्वाने सत्तेला साधन मानले साध्य नाही. कारण सत्ता हे अंतिम ध्येय नाही. सत्तेशिवाय दलित शोषित वंचितांचे सामाजिक परिवर्तन करता येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सत्तेशिवाय सामाजिक, राजकीय बदल घडवून आणले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नंतर दादासाहेब गायकवाड यांनी अभूतपूर्वक असा भूमिहिनांचा लढा उभारला. म्हणून सत्ता हे साध्य नाही तर साधन आहे. सत्तेच्या साध्य साधन सुचितेबाबत प्रतिक्रिया देतांना बाळासाहेब आंबेडकर म्हणाले, "आंबेडकरी जनतेने सामाजिक आणि आत्मसन्मानाच्या प्रश्नांना नेहमी महत्त्व दिलेले आहे आणि ही काही आजची परिस्थिती नाही, ती बाबासाहेबांच्या काळापासून चालत आलेली परंपरा आहे. काँग्रेस आणि बाबासाहेब यांच्यात गंभीर मतभेद होते. काँग्रेसचे म्हणने होते की, सत्ता घेतली की, प्रश्न आपोआप सुटतील. बाबासाहेब म्हणत होते की, सामाजिक बदल आपोआप होत नाहीत तर ते घडवून आणावे लागतात. या भूमिकेला आंबेडकरी पुढाऱ्यांनी ज्या ज्या वेळेस नाकारले. त्या त्या वेळेस आंबेडकरी चळवळ धोक्यात आली."[३३]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नंतरच्या दलित राजकीय नेतृत्वांनी सत्तेला साधन न मानता साध्य मानल्यामुळे दलित राजकीय चळवळ प्रभावहिन झाली. ज्या काँग्रेसला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कायमचा विरोध केला. त्याच काँग्रेसशी एकरूप झाले. सत्ता संबंध जोपासण्यातून सामाजिक आंदोलनाकडे दुर्लक्ष केले. सामाजिक

आंदोलनाकडे दुर्लक्ष झाल्यामुळे दलित चळवळ दिशाहीन झाल्या. त्यामुळे बाळासाहेब आंबेडकर या नेतृत्वांनी सत्तेला साध्य न मानता साधन मानले आहे. सत्ता साधन आहे . ध्येय नाही हा विचार मांडून दलित राजकीय चळवळीला योग्य दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण काम केले.

बाळासाहेब आंबेडकर हे व्यक्तिनिष्ठ राजकारणा ऐवजी विचारनिष्ठ / तत्वनिष्ठ राजकारण करणारे नेतृत्व आहे. बाळासाहेब आंबेडकर यांनी स्वत:च्या हिताचे राजकारण केले नाही. त्यांचे राजकारण हे विचारनिष्ठ किंवा तत्वनिष्ठ राजकारण आहे. व्यवस्था परिवर्तन हे बाळासाहेब आंबेडकरांच्या राजकारणाचे ध्येय आहे. यासाठी त्यांनी आधी स्वाभिमानी बना, मग सत्ताधारी बना, सत्ता हवी हक्काची, भिक नको सत्तेची असा नारा दिला. बाळासाहेब आंबेडकरांनी व्यवस्था परिवर्तन किंवा समाज परिवर्तन करण्यासाठी सत्ता हे ध्येय नाही तर साधन मानले आहे. राजकारणातील सत्ता संबंधाकडे पाहतांना त्यांनी व्यक्तिनिष्ठ राजकारणापेक्षा तत्वनिष्ठ राजकारणाला प्राधान्य दिल्याचे दिसून येते.

बाळासाहेब आंबेडकर यांनी जिल्हा परिषदांच्या निवडणुकांमध्ये काँग्रेसबरोबर युती केली, परंतु बाळासाहेब आंबेडकरांच्या अटी व शर्तीनुसार युती झाली. बाळासाहेब आंबेडकर यांनी लोकसभा आणि विधानसभा निवडणूक २०१४ मध्ये काँग्रेसकडून युतीचा प्रस्ताव आला होता, पण बाळासाहेबांच्या अटी व शर्ती काँग्रेसला अमान्य झाल्यामुळे युती फिसकटली. लोकसभा निवडणूक २०१४ मध्ये बाळासाहेब आंबेडकर यांनी आपल्या तत्वाशी तडजोड करून काँग्रेसशी युती केली असती तर लोकसभेत त्यांचा विजय झाला असता. युती न झाल्यामुळे मतविभाजनाचा फायदा भाजपाच्या संजय धोत्रे यांना झाला. बाळासाहेब आंबेडकर यांनी व्यक्तिनिष्ठ राजकारणा ऐवजी तत्वनिष्ठ राजकारण करून अकोला जिल्हा ताब्यात ठेवला. विधानसभा निवडणुकीत स्वबळावर एक किंवा दोन आमदार निवडून आणण्याची परंपरा कायम ठेवली. म्हणून

बाळासाहेब आंबेडकर यांच्या राजकारणाने स्वाभिमानी तत्वनिष्ठ राजकारणाची प्रचिती होते.

बाळासाहेब आंबेडकर यांचे नेतृत्व हे राजकीय सत्तेपेक्षा आर्थिक सत्तेला महत्त्व देणारे आहे. राजकीय सत्ता गेली तरी चालेल, परंतु आर्थिक सत्ता जाता काम नये अशी भूमिका बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाची आहे. राजसत्ता ही अर्थसत्तेच्या अधीन असते. जागतिकीकरणाच्या युगात राजकीय सत्तेचा प्रभाव हा आर्थिक सत्तेकडे आला. राजकीय सत्तेला आर्थिक सत्तेची जोड आवश्यक आहे. बाळासाहेब आंबेडकर यांनी राजकीय सत्तेबरोबर दलित बहुजनांची आर्थिक सत्ता वाढवण्यासाठी गाव तिथे उद्योग हा उपक्रम सुरु केला आहे. ग्रामीण भागातील सुशिक्षित दलित बहुजन तरुणाला उद्योजक बनवण्यासाठी हा उपक्रम निर्माण केला आहे. म्हणून बाळासाहेब आंबेडकर यांचे राजकीय सत्तेपेक्षा आर्थिक सत्तेला अधिक महत्त्व देणारे नेतृत्व आहे.

आर्थिक सत्तेचे महत्त्व विशद करतांना बाळासाहेब आंबेडकर म्हणतात, "खाजगीकरणामुळे सरकारचे एका सार्वजनिक कंपनीवरील नियंत्रण कमी होत आहे. आर्थिक सुत्रे आपल्या हातात आली व नंतर राज्यसंस्था इतरांच्या ताब्यात गेली तरी काही फरक पडणार नाही. उलट आर्थिक सत्तेच्या नियंत्रणामुळे राजकीय सत्तेवर अंकुश ठेवता येईल."[३४]

आर्थिक सत्तेच्या नाड्या बहुजनांच्या हाती' घेतल्या की व्यवस्था परिवर्तन / समाज परिवर्तन हातात येते. हवी तशी व्यवस्था निर्माण करता येते. बाळासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाने आर्थिक सत्तेचे महत्त्व ओळखून तिला प्राधान्य दिले. ग्रामीण भागातील सुशिक्षित कौशल्य संपन्न तरुणांना उद्योजग बनवण्यासाठी 'गाव तिथे उद्योग' हा आर्थिक कार्यक्रम प्रारंभ केला.

### ५.६ बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाचा प्रभाव :

राजकीय नेतृत्वाचा राजकीय कार्यक्रम, विचारधारा, संघटनात्मक बांधणी

आणि नेतृत्वाचा जनतेशी असलेला प्रत्यक्ष जनसंपर्क या आधारे नेतृत्व आपला प्रभाव निर्माण करते. नेतृत्व राजकीय कार्यक्रमाच्या माध्यमातून कार्यकर्ता वर्गाला आकर्षित करते. प्रत्येक राजकीय नेतृत्वाला जाणणारा एक वर्ग असतो. बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाला माणणाऱ्यात बौध्द धर्मियांशिवाय बहुजन समाज आहे. महाराष्ट्रातील बौध्द धर्मिय वेगवेगळ्या विभागात वसलेला आहे. "बौध्द समाजाच्या लोकसंख्येच्या प्रमाणाचा महाराष्ट्राच्या राजकीय प्रक्रियेवर व रिपब्लीकन राजकारणावर प्रभाव दिसून येतो. "बौध्दाचे लोकसंख्येचे प्रमाण कोकणात ६ टक्के पश्चिम महाराष्ट्र ०८ टक्के मराठवाड्यात १०-१२ टक्के तर विदर्भात २०-२५ टक्के इतकी आहे."[३५]

महाराष्ट्रातील बौध्द समाजाच्या लोकसंख्येच्या प्रमाणाचा महाराष्ट्राच्या राजकारणावर प्रभाव पडतो. महाराष्ट्राच्या विभागानुसार त्या-त्या रिपब्लीकन नेतृत्वाचा प्रभाव दिसून येतो. बाळासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाचा विदर्भातील सर्व मतदार संघात व्यापक असा प्रभाव आहे. मराठवाड्यात गंगाखेड, केज, नांदेड, कळंब, हदगाव, हिंगोली, बदलापूर, मुखेड, भोकर, वसमत, कळमनुरी या मतदार संघात बाळासाहेब आंबेडकर यांचा मोठा प्रभाव आहे. उत्तर महाराष्ट्रामध्ये चाळीसगाव, भुसावळ, देवळाली, धुळे, नाशिक मतदार संघात बाळासाहेब आंबेडकर यांचा प्रभाव दिसून येतो. पेश्चिम महाराष्ट्रामध्ये बाळासाहेब आंबेडकर यांचा फारसा प्रभाव दिसून येत नाही. बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाने विदर्भातील अकोला जिल्ह्यात व्यापक असा प्रभाव दिसून येतो. महाराष्ट्राच्या राजकारणात बाळासाहेब आंबेडकर यांनी अकोला जिल्ह्यातील बिगर मराठा जातीच्या राजकीय ऐक्यातून अकोला पॅटर्न निर्माण केला आहे. अकोला जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था शहरी आणि ग्रामीण संस्थावर आपली पकड कायम ठेवली आहे. बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाने बिगर मराठा जातीचे राजकीय ऐक्य अकोला पॅटर्नच्या माध्यमातून केले.

**५.७ बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाचे राजकीय यशापयश / राजकारणातील सत्ता सहभाग :**

लोकशाही राजकीय प्रक्रियेत जनतेला प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार असतो. लोकशाही रुपी रथाचे चाक असलेल्या राजकीय पक्षात निवडणुकीच्या मार्गाने सत्ता संपादन करण्यासाठी स्पर्धा चालते. राजकीय पक्ष नेत्यांच्या नेतृत्वाखाली निवडणुकांचे संचलन करीत असतात. बाळासाहेब आंबेडकर यांनी राजकारणात सहभागी होण्यासाठी भारिप बहुजन महासंघ या पक्षाची स्थापना केली. बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली १९८९, १९९१, १९९८, २००४, २००९, २०१४ च्या लोकसभा निवडणुका संपन्न झाल्या. १९९८ च्या बाराव्या लोकसभा निवडणुकीत स्वत: बाळासाहेब आंबेडकर यांनी काँग्रेसशी युती करून अकोला लोकसभा निवडणूक लढवली. १९९८ च्या बाराव्या लोकसभा निवडणुकीत बाळासाहेब आंबेडकर यांचा ३,६६,४२७ मते मिळवून विजय झाला. त्यानंतर १९९९ च्या तेराव्या लोकसभा निवडणुकीत भारिप बहुजन महासंघाने लोकसभा निवडणुकीत एकूण ०४ उमेदवार उभे केले होते. या उमेदवारांची नावे व त्यांना मिळालेली मते पुढील प्रमाणे -

| अ.क्र. | मतदार संघ | उमेदवाराचे नाव | जात धर्म | मिळालेली मते | क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | अकोला | बाळासाहेब आंबेडकर | बौध्द | २७२२४३ | विजयी |
| २ | हिंगाली | माधवराव नाईक | धनगर | २१६६२९ | २ |
| ३ | मुंबई मध्य उत्तर | राजाभाऊ ढाले | बोध्द | ११५९४० | २ |
| ४ | मुंबई दक्षिण मध्यम | दादा सांमत | ब्राम्हण | ७७७४७ | ३ |

१९९९ च्या लोकसभा निवडणकीत चार उमेदवारापैकी अकोला लोकसभा मतदार संघातून बाळासाहेब आंबेडकर हे सलग दुसऱ्यांदा विजयी झाले होते तर दोन उमेदवारांना दुसऱ्या क्रमांकाची मते मिळाली चौथा उमेदवार हा तिसऱ्या क्रमांकावर होता.

"भारिप - बहुजन महासंघाने भाकप - माकप, समाजवादी पक्ष, समाजवादी

जन परिषद, शेकाप व रिपाई ( डेमॉक्रॅटिक ) या पक्षांना सोबत घेऊन डावी लोकशाही आघाडी बनविली. यावेळी भारिप बहुजन महासंघाने १६ जागांवर उमेदवार उभे केले."[३६] २००४ च्या चौदाव्या लोकसभा निवडणुकीत भारिप बहुजन महासंघाने डावी लोकशाही आघाडी तयार करून सोळा उमेदवार उभे केले होते. त्यापैकी एकही उमेदवार विजयी झाला नाही. १९९९ च्या लोकसभा निवडणुकीतील मतांच्या टक्केवारीच्या तुलनेत मतांचे प्रमाण कमी झाले होते. लोकसभा मतदार संघातून दुसऱ्यांदा विजयी होणारे बाळासाहेब आंबेडकर तिसऱ्या क्रमांकावर होते तर नांदेडमधून सुरेश गायकवाड, बुलढाण्यातून जाधव भिमराव, इचलकरंजीतून कांबळे सुकुमार, जालन्यातून गाडेकर रामु, नंदुरबारमधून, ठाकरे तुकाराम या उमेदवारांना तिसऱ्या क्रमांकाची मते मिळाली होती.

२००९ च्या पंधराव्या आणि २०१४ च्या सोळाव्या लोकसभा निवडणुकीत बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वातील भारिप बहुजन महासंघाचा एकही उमेदवार विजयी झाला नाही. १९९८ आणि १९९९ च्या लोकसभा निवडणुकीत बाळासाहेब आंबेडकर यांनी काँग्रेस सोबत युती करून निवडणूक लढवल्यामुळे बाळासाहेब आंबेडकर यांचा सलग दोनदा अकोला लोकसभा निवडणुकीत विजय झाला. २००४, २००९, २०१४ च्या लोकसभा निवडणूक डावी आघाडी आणि महाराष्ट्र लोकशाही आघाडी निर्माण करून निवडणुका लढवल्या होत्या. २००४, २००९, २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत भारिप बहुजन महासंघाचा एकही उमेदवार विजयी झाला नाही. २०१४ च्या सोळाव्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने युतीचा प्रस्ताव ठेवला होता, पण बाळासाहेब आंबेडकर यांच्या अटी शर्ती काँग्रेसला मान्य न झाल्यामुळे युती फिसकटली. या निवडणुकीत बाळासाहेब आंबेडकर यांना २,३८,७७६ मते मिळून तिसऱ्या क्रमांकवर होते.

काँग्रेसशी युती न झाल्यामुळे मत विभाजनाचा फटका बाळासाहेबांना बसला

तर भाजपचे संजय धोत्रे यांना ४५६४७२ मते मिळून त्यांचा विजय झाला. काँग्रेसचे पटेल हिदायतुल्ला यांना २५३३५६ मते मिळून ते दुसऱ्या क्रमांवर होते."सोळाव्या लोकसभा निवडणुकीत भारिप बहुजन महासंघाने २३ उमेदवार उभे केले होते. त्यापैकी एकाही उमेदवाराचा विजय झाला नाही, तर २२ उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली. ०.७५ टक्के पक्षाला मते मिळाली."[३७]

१९९९ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस सोबत युती करून भारिप बहुजन महासंघाने ३४ उमेदवार उभे केले होते. त्यापैकी साक्री मतदार संघातून वसंतराव सूर्यवंशी, बोरगाव मंजू मतदार संघातून दशरथ भांडे, अकोट मतदार संघातून रामदास बोडके हे तीन उमेदवार विजयी झाले होते. "मूर्तीजापूर हरिसिंग राठोड, चिखली प्रताप राजपूत, भोकर नागनाथ घिसेवाड, मंगरुळपिर महादेऊ राठोड, वाशिम, मधुकर जुगळे, सोलापूर पी.आर. बनसोड, माहिम अबदुल वहाब चौधरी, नायगाव सतिश पेडणेकर या आठ उमेदवारांना दुसऱ्या क्रमांची मते प्राप्त झाली होती."[३८]

१९९९ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत बाळासाहेब आंबेडकर यांनी काँग्रेस सोबत युती केल्यामुळे तीन उमेदवार विजयी झाले होते आणि आठ उमेदवार दुसऱ्या स्थानावर होते. याचे कारण स्वबळावरील निवडणुकीत भारिपचा पराभव झाल्याचे दिसून येते. भारिप बहुजन महासंघाच्या उमेदवारांना विजयी होण्यासाठी अन्य मतदारांच्या मदतीची आवश्यकता दिसून येते.

२००४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीमध्ये बाळासाहेब आंबेडकर यांनी कोणत्याही पक्षाशी युती न करता स्वबळावर निवडणुक लढवली. या निवडणुकीत भारिप बहुजन महासंघाने ८३ उमेदवार उभे केले होते. "२००४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत ८३ पैकी बोरगाव मंजू मतदार संघातून हरिदास भदे या उमेदवाराचा विजय झाला तर बाळापूर मतदार संघातून सय्यद मोहसिनभाई, कारंजा मतदार संघातून बाळासाहेब डहाके हे दोन उमेदवार दुसऱ्या क्रमांकावर होते."[३९]

२००४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत पक्षाने स्वबळावर निवडणूक लढवली होती. या निवडणुकीत १९९९ च्या तुलनेत २००४ ला पक्षाला दोन जागा गमवाव्या लागल्या. एका जागेवर पक्षाच्या उमेदवाराचा विजय झाला. महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २००९ मध्ये भारिप बहुजन महासंघाचे हरिदास भदे यांचा अकोला पूर्व मतदार संघातून विजय झाला होता. २०१४ ची महाराष्ट्र विधानसभा निवडणूक बाळासाहेब आंबेडकर यांनी महाराष्ट्र लोकशाही आघाडीची स्थापना करून लढवली. "२०१४ च्या विधानसभा निवडणुकीत भारिप बहुजन महासंघाचे विद्यमान आमदार हरिदास भदे यांचा भाजपाच्या रणधीर सावरकर यांनी पराभव केला तर बाळापूर विधानसभा मतदार संघातून बळीराम शिरसकर यांचा ४१४२६ मते प्राप्त करून विजय झाले. जळगाव ( जा. ) मतदार संघातून बाळासाहेब तायडे, मुर्तिजापूर मतदार संघातून हरिष पिंपळे, कारंजा मतदार संघातून महंमद युसूफ पंजानी या तीन उमेदवारांना दुसऱ्या क्रमांकाची मते मिळाली."[४०]

बाळासाहेब आंबेडकर यांनी महाराष्ट्र लोकशाही आघाडीची स्थापना करून निवडणूक लढवली. या आघाडीस भाकपा एक, माकपा एक, शेकाप तीन, भारिप एक अशा पाच उमेदवारांचा विजय झाला. बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वातील भारिप बहुजन महासंघाने आपली एक जागा कायम राखून महाराष्ट्र विधानसभेतील आपल्या पक्षाचे राजकीय अस्तित्व टिकून ठेवले.

बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वातील भारिप बहुजन महासंघाने महाराष्ट्राच्या राजकारणात आपले स्वतंत्र राजकीय अस्तित्व टिकून ठेवले आहे. बाळासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वातील भारिप बहुजन महासंघाचा संसद आणि विधी मंडळातील सत्ता सहभाग दर्शविणारा तक्ता क्रमांक - १

| अ.क्र. | लोकसभा सदस्य | राज्यसभा सदस्य | विधानसभा सदस्य | विधान परिषद सदस्य |
|---|---|---|---|---|
| ०१. | निरंक | निरंक | ०१ | निरंक |

तक्ता क्र. १ वरुन असे निदर्शनास येते की, बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वातील भारिप बहुजन महासंघाच्या राजकारणातील सत्ता सहभागाचे विश्लेषण केल्यास २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत पक्षाचा एकही उमेदवार निवडून आला नाही. राज्यसभेतील प्रतिनिधित्व निरंक आहे. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत बळीराम सिरसकर यांचा विजय झाला. विधान परिषदेतील प्रतिनिधित्व निरंक आहे.

बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वातील भारिप बहुजन महासंघाचा महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था शहरी यामधील सत्ता सहभाग दर्शविणारा

**तक्ता क्र. ०२.**

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | नगर पालिका सदस्य | महानगर पालिका सदस्य |
|---|---|---|---|
| १ | अकोला | ७ | ७ |
| २ | बुलढाणा | | ४ |
| ३ | नागपूर | | २ |
| ४ | चंद्रपूर | | ४ |
| ५ | मुंबई | | १ |
| ६ | बीड | | २ |
| ७ | परभणी | | ३ |
| ८ | औरंगाबाद | | १ |

तक्ता क्र. २ वरुन असे निदर्शनास येते की, बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वातील स्थानिक स्वराज्य संस्था, शहरी नगरपालिका आणि महानगरपालिकामध्ये सत्ता सहभाग किंवा प्रतिनिधित्वाचे विश्लेषण करतांना असे दिसून येते की, अकोला महापालिकेत ज्योत्सना गौतम गवई, मंगला लखन पाटोळे, वैशाली किशोर मानवतकर,

धनश्री निलेश अभ्यंकर, रामभाऊ तावडे, बबलू भाऊ जगताप हे सात  नगरसेवक भारिप बहुजन महासंघाचे आहेत बुलढाणा महानगर पालिकेत शांताबाई रामराव सोनावणे, ॲड. सुखदेव हिवराळे, कोकीळा  रामभाऊ कचरे, सविता संजय देशमुख, हे चार नगरसेवक आहेत, नागपूर महानगरपालिकेत राजाभाऊ लोखंडे, भावना ढकणे हे दोन नगरसेवक आहेत. चंद्रपूर महानगरपालिकेत राखी रामटेके, कुणाल रामटेके, सुनिल खोब्रागडे, विजय मेश्राम हे चार नगरसेवक आहेत, तर मुंबई महानगरपालिकेत अरुण कांबळे हे एकमेव नगर सवेक आहेत. बीड महानगरपालिकेत राजेश साळवे आशाताई राम गायकवाड हे दोन नगर सेवक आहेत. परभणी महानगर पालिकेत उत्तम खंदारे, फराह अब्दुल रशिद हे दोन नगरसेवक आहेत आणि औरंगाबाद महानगर पालिकेत अमित भुईगळ हे एकमेव नगर सेवक आहेत."[४१] यावरुन हे स्पष्ट होते की, बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाचा अकोला, बुलढाणा, बीड, चंद्रपूर, नागपूर, मुंबई, परभणी, औरंगाबाद जिल्ह्यातील शहरी भागात प्रभाव दिसून येतो.

बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वातील भारिप बहुजन महासंघाचा ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थातील राजकीय सहभाग दर्शविणारा

**तक्ता क्रमांक ०३**

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | जिल्हा परिषद सदस्य | पंचायत समिती सदस्य | प.सं. सभापती |
|---|---|---|---|---|
| | अकोला | २५ | ५२ | ६ |
| | बुलढाणा | ४ | ७ | १ |
| | वाशिम | ३ | | |
| | नांदेड | १ | | |

तक्ता क्र. ३ वरुन असे निदर्शनास येते की, बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थातील सत्ता सहभाग किंवा प्रतिनिधित्वाचे विश्लेषण करतांना असे दिसून येते की "अकोला जिल्हा परिषदेत ५३ पैकी २५

सदस्य हे भारिप बहुजन महासंघाचे आहेत. अकोला जिल्ह्यात सात पंचायत समित्यापैकी ०६ पंचायत समित्या भारिप बहुजन महासंघाच्या ताब्यात आहेत. बुलढाणा जिल्हा परिषदेत ०४ सदस्य आहेत तर ०७ पंचायत समिती सदस्य आहेत. वाशिम जिल्हा परिषदेत ०३ सदस्य, नांदेड जिल्हा परिषदेत ०१ सदस्य आहे. अकोला जिल्ह्यातील सात पंचायत समित्यापैकी सहा पंचायत समित्या बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वातील भारिप बहुजन महासंघाच्या ताब्यात आहेत. त्यामध्ये निरंजन शिरसाठ हे बाळापूर पंचायत समितीचे सभापती, डॉ. सुनिल जाधव, बार्शी टाकळी, लिलाताई गावंडे, शेलारा, रंजनी तावडे अकोला, संजय लोखंडे पातूर, मूर्तिजापूर इत्यादी पंचायत समित्या भारिप बहुजन महासंघाच्या ताब्यात आहेत. बुलढाणा जिल्ह्यातील शेगांव पंचायत समिती भारिप बहुजन महासंघाच्या ताब्यात आहेत."[४२]

यावरुन हे स्पष्ट होते की, बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाचा विदर्भात व्यापक असा प्रभाव आहे. विशेषत: अकोला, वाशिम, बुलढाणा आणि मराठवाड्यात नांदेड या ठिकाणी प्रभाव दिसून येतो. विदर्भातील अकोला जिल्ह्यात पूर्णपणे प्रभाव कायम टिकून ठेवला आहे. यातून बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वातून अकोला पॅटर्न निर्माण झाला; पण हा अकोला पॅटर्न महाराष्ट्रभर यशस्वी करण्यात बाळासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाला अपयश आल्याचे दिसून येते.

### ५.८ बाळासाहेब आंबेडकर यांचा जनसंपर्क :

राजकीय नेतृत्व आणि जनता यांच्या परस्पर संबंधावर नेतृत्वाचा प्रभाव अवलंबून असतो. राजकीय नेतृत्व आपल्या अनुयायांशी जनसंपर्क प्रस्थापित करतांना जनसमुहांशी, इलेक्ट्रॉनिक मिडिया, प्रिंट मिडिया याद्वारे जनसंपर्क प्रस्थापित करतो. राजकीय नेतृत्वाचा अनुयायांच्या संपर्कावर त्या राजकीय नेतृत्वाची यशस्विता अवलंबून असते. जनसंपर्क प्रस्थापित करणाऱ्या योग्य आणि प्रभावी साधनांचा वापर जे नेतृत्व करते त्या नेतृत्वाचा राजकीय प्रभाव निर्माण होऊन राजकीय यश संपादन करता येते.

"राजकीय नेतृत्वाचा संपर्क कोणाशी असवा हा महत्त्वाचा प्रश्न आहे एक म्हणजे जनसमुहांशी संपर्क असावा. दोन इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमांशी संपर्क असावा. सद्या राजकीय नेतृत्व इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमांशी संपर्क जादा ठेवत आहे. प्रत्यक्ष मतदारांशी जनसंपर्क मात्र कमी ठेवत आहे. याचं कारण नेतृत्वाची अशी धारणा आहे की, नेतृत्व आणि मतदार यांच्यातील सांधा इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यम जोडतात."[४३]

आधुनिक राजकीय व्यवस्थेत नेतृत्व जनसमुहांशी / अनुयायांशी प्रत्यक्ष संपर्क ठेवण्याऐवजी इलेक्ट्रॉनिक आणि प्रिंट मिडिया, Faceboook, Twitter या सारख्या सामाजिक माध्यमांचा वापर जास्त प्रमाणात करतांना दिसून येते. या सामाजिक माध्यमांमुळे नेतृत्वाचा प्रत्यक्ष जनतेशी असलेला संपर्क हा कमी झाल्याचे दिसून येते. राजकीय नेतृत्व आपली भूमिका, कार्यक्रम, जाहिरनामा, जाहिर सभामधील भाषणे, प्रसार सभा, विविध कार्यक्रमांचे संचलन प्रसार माध्यमाद्वारे होतांना दिसून येते. २०१४ च्या लोकसभा आणि महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत सर्वाधिक प्रसार माध्यमांचा वापर करण्यात आला.

बाळासाहेब आंबेडकर यांचा जनसंपर्क हा ग्रामीण भागातील जनतेपर्यंत प्रस्थापित झाला आहे. बाळासाहेब आंबेडकर जनसंपर्क प्रस्थापित करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक आणि प्रिंट मिडीयांचा वापर करतात. त्यामध्ये Facebook, Twitter, पक्षाचे संकेत स्थळ इत्यादींच्या माध्यमांचा आधार घेतात. बाळासाहेब आंबेडकर यांनी जनसंपर्क प्रस्थापित करण्यासाठी त्या त्या विभागातील समस्यांवर आधारित मोर्चे, जाहिरसभा, आंदोलनाचे आयोजन करून जनसंपर्क हा अखंडीत ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. बाळासाहेब आंबेडकर यांनी जिल्हा पातळीवरुन पक्षाच्या विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रभर अहोरात्र फिरतात, पण महाराष्ट्रातील सर्व तालुकास्तरावर कार्यकर्ता मेळावा, प्रचार सभा, यांचे आयोजन करून खालच्या स्तरापर्यंत (Grass

Route ) जनसंपर्क प्रस्थापित केल्यास राजकीय प्रभाव निर्माण होऊन राजकीय यश संपादन करण्यास सुलभ होईल. बाळासाहेब आंबेडकर यांच्या शिस्तप्रिय स्वभावामुळे, तत्वामुळे , पक्षातील अनेक जेष्ठ नेते पक्ष सोडून गेले आहेत. त्यामध्ये मखराम पवार, दशरथ भांडे, रामदास बोडखे, अर्जून डांगळे, राजा ढाले, इत्यादी पक्षाला सोडून निघून गेले. यामुळे पक्षात कार्यकर्ता वर्ग टिकत नाही असा आरोप केला जातो. बाळासाहेबांच्या नेतृत्वामुळे पक्षात राजकीय नेतृत्वाची दुसरी फळी निर्माण होऊ शकली नाही. बाळासाहेब आंबेडकर यांनी प्रत्यक्ष कार्यकर्ता आणि जनता यामध्ये जनसंपर्क प्रस्थापित करून राजकीय सुसंवाद निर्माण केल्यास भारिप बहुजन महासंघास अजून मजबुत प्रभावी होण्यास मदत होईल.

महाराष्ट्रात ज्या भागात दलित समाजावर अन्याय अत्याचार होतात. त्या ठिकाणी बाळासाहेब आंबेडकर तात्काळ घटनास्थळी जाऊन घटनेचा आढावा घेत नाहीत. असाही दलित समाजातून आरोप होतो. यासाठी बाळासाहेबांनी दलित समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचारा विरोधात आक्रमक भूमिका घेऊन त्यांना योग्य तो न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर दलित चळवळीचे नेतृत्व रिपब्लीकन पक्षाच्या नेत्यांनी केले. दलित राजकीय नेतृत्वानी काही काळ चांगली कामगिरी केली. त्यामुळे रिपब्लीकन पक्षाविषयी महाराष्ट्रातील दलित जनतेमध्ये अपेक्षा वाढल्या होत्या, पण अल्पावधीतच हे दलित राजकीय नेतृत्व काँग्रेसवासी झाले. यातून पक्षात गटातटाचे राजकारण सुरु झाले. यातून दलित समाजात असंतोष निर्माण झाला. या असंतोषातून दलित तरुणांची दलित पँथर ही संघटना स्थापन झाली. दलित पँथर ही महाराष्ट्रातील दलित समाजावरील अन्याय अत्याचाराच्या विरोधात आक्रमक संघटना निर्माण झाली होती. अल्पावधितच दलित पँथर ही संघटना वैचारिक मतभेदामुळे फुटली. ज्या संघटनाकडे महाराष्ट्रातील दलित समाज आशेचा किरण

म्हणून पाहत होता. त्याच संघटना गटातटात विभागल्या होत्या. त्यामुळे महाराष्ट्रातील दलित शोषितांचे प्रश्न कायम राहिले. रिपब्लीकन पक्षाला नवसंजीवनी देण्यासाठी भारतीय रिपब्लीकन पक्ष स्थापन केला. १९८०च्या दशकात बाळासाहेब आंबेडकर यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात सक्रिय झाले.

. "दिनांक २० फेब्रुवारी १९८५ रोजी गोरेगांव येथे ऐक्यवादी कार्यकर्त्यांची एकीसाठी सभा बोलावली. त्या समितीचे अध्यक्ष जामगेकर व सचिव मनोहर देठे आणि काही सभासदांच्या निवडी करण्यात आल्या. या समितीने रिपब्लीकन पक्षाच्या सर्व गटांच्या नेत्यांबरोबर बोलणी करावी आणि त्यांना ऐक्यासाठी तयार करावे असे ठरवण्यात आले."[४४]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील पक्ष स्थापन करून राजकीय जमातीचे स्वप्न साकार करण्यासाठी आंबेडकर निष्ठ नेत्यांकडून रिपब्लीकन ऐक्याचे प्रयत्न अनेक वेळा करण्यात आले; पण रिपब्लीकन पक्षाचे अनेक वेळा ऐक्य झाले. पुन्हा दुभंगले हा इतिहास आहे. १९८० च्या दशकात महाराष्ट्राच्या राजकारणात सक्रिय झालेले बाळासाहेब आंबेडकर या ऐक्यात सामील झाले होते.

### ५.९ बाळासाहेब आंबेडकर यांची रिपब्लीकन ऐक्याबाबत भूमिका :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाची स्थापना त्यांच्या अनुयायांनी ०३ ऑक्टोबर १९५७ रोजी केली. डॉ. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर आंबेडकरी नेतृत्वात सत्ता स्पर्धा, मोह, अहंभाव, पदप्रतिष्ठा यामुळे नेतृत्वात दुही निर्माण झाली. दादासाहेब गायकवाड आणि बी.सी. कांबळे यांच्यातील वैचारिक मतभेदातून काही शूल्लक तांत्रिक कारणाने ०३ ऑक्टोबर १९५८ रोजी पक्ष दुभंगला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्याच्या हयातीतच नेतृत्वासंबंधीच्या स्पर्धेची चाहूल लागली होती. नेतृत्वाच्या ह्या बेकीविषयी अस्वस्थ होऊन बाबासाहेब म्हणाले होते. "भांडा, आपापसात भांडा, परंतु चार भिंतीच्या आत.

तुमच्या बेकीचे दर्शन सार्वजनिक ठिकाणी झाले तर आपल्या शत्रुच्या हाती कोलीत दिल्यासारखे होईल. अन्याय अत्याचारांना पुन्हा एकदा उधाण येईल सरकार दरबारी वचक राहणार नाही."[४५]

डॉ. बाबासाहेबांना आपल्यानंतर आपल्या चळवळीचे काय होईल याची चिंता सतावत होती. ही भीती डॉ. बाबासाहेबांनी आपले स्वीय सहाय्यक नानकचंद रतू यांच्यापुढे व्यक्त केली होती. ही भीती खरी ठरली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नंतरच्या दलित नेतृत्वामध्ये वैचारिक मतभेद होऊन पक्ष अल्पावधीतच दुभंगला होता. भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या प्रयत्नात ३० डिसेंबर १९५८ रोजी पहिले ऐक्य घडवून आणले. १९६२ च्या निवडणुकीत दादासाहेब गायकवाड आणि बी.सी. कांबळे यांच्या गटाचा पराभवाच्या पार्श्वभूमिवर १९६३ मध्ये भैयासाहेब आंबेडकर यांनी दुसऱ्यांदा ऐक्याचा प्रयत्न केला. त्यानंतर १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पूर्वी एक वर्ष अगोदर १९६६ मध्ये दादासाहेब रुपवते यांनी तिसऱ्यांदा ऐक्याविषयक प्रयत्न केला. रिपब्लीकन पक्षाच्या ऐक्यात बाधा निर्माण करणारे बी.सी. कांबळे यांनी १९७१ मध्ये स्वत: पुढाकार घेऊन ऐक्य घडवून आणण्याचा प्रयत्न केला, पण त्यांना ऐक्यवाद्यांनी सहकार्य केले नाही. त्यानंतर २६ जानेवारी १९७४ रोजी ऐक्याचा पुन्हा प्रयत्न झाला.

२० फेब्रुवारी १९८५ च्या रिपब्लीकन ऐक्याबाबत बाळासाहेब आंबेडकर म्हणाले, "सामुदायिक नेतृत्वाचा मुद्दा सोडून बाकी सगळे मला मान्य आहे. कसले ऐक्य घेऊन बसलात. तुम्ही सगळ्यांचीच आपल्या गटाचे झेंडे गुंडाळून माझ्या भारतीय रिपब्लीकन पक्षात सामील व्हावे. यावर कार्यकर्ते नाराज झाले."[४६]

१९५७ साली स्थापन झालेला रिपब्लीकन पक्ष वैचारिक मतभेदामुळे एक वर्षाच्या आतच फुटला. १९५८ पासून अनेकदा रिपब्लीकन नेत्यांनी ऐक्य घडवून आणण्याचा प्रयत्न केला, परंतु दलित राजकीय नेत्यांच्या अंतर्गत मतभेदामुळे, अहंभावामुळे रिपब्लीकन ऐक्य दीर्घकाळ टिकू शकले नव्हते. बाळासाहेब आंबेडकर

यांचे वडील भैयासाहेब आंबेडकर यांनी दोन वेळा रिपब्लीकन ऐक्याचा प्रयत्न केला होता. रिपब्लीकन ऐक्याचे अनेक फसवे प्रयोग होऊन ऐक्य झाले अन् बिघडले. हा इतिहास आहे. त्यामुळे बाळासाहेब आंबेडकर यांनी सर्व रिपब्लीकन नेत्यांना आपला पक्ष भारतीय रिपब्लीकन पक्षात विलिन करण्यास सांगितले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतील रिपब्लीकन पक्ष दलित नेत्यांनी स्थापन केला होता, पण वैचारिक मतभेद, अहंभाव, स्वार्थ, यामुळे रिपब्लीकन पक्षाची वाताहत झाली. दुभंगलेल्या रिपब्लीकन पक्षाला एकसंघ करण्यासाठी अनेक प्रयत्न झाले. त्यामध्ये १९८९ ला दलित नेत्यांना एकत्र आणण्यासाठी मुंबईतील तरुणांनी पुढाकार घेतला. दलित समाजाच्या दबावामुळे सर्व दलित नेते एकत्र आले. "०८ डिसेंबर १९८९ रोजी सायंकाळी डॉ. आंबेडकर भवन मुंबई येथे बैठक होऊन आंबेडकरी विचाराचे राजकीय पक्ष व संघटनांचे ऐक्य व्हावे असे ठरवण्यात आले आहे. ऐक्याचा तपशिल व आराखडा ठरविण्यासाठी आंबेडकरी विचारांच्या सर्व राजकीय संघटना व पक्ष यांची बैठक १९ डिसेंबर १९८९ रोजी डॉ. आंबेडकर भवन दादर मुंबई येथे बोलावण्यात आली आहे तरी तरुणांनी उपोषण मागे घ्यावे"[४७]

दलित समाजातील तरुणांच्या आमरण उपोषणामुळे आणि दलित समाजाच्या दबावामुळे सर्व दलित संघटना आणि नेते एकत्र आले. ऐक्य घडवून आणण्याचे व दलित नेत्या मार्फत समाजाला आश्वासन देण्यात आले. १९९० च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला पाटींबा घ्यायचा का ? जनता दलाला पाठींबा द्यायचा या मुद्यावर पुन्हा एकदा ऐक्य भंगले होते. रिपब्लीकन पक्षाच्या निवडणुकीतील युतीबाबत बाळासाहेब आंबेडकर म्हणाले, "निवडणुकीतील सक्रिय सहभागाला विरोध केला. त्यांच्या मते पक्ष बांधणी न झाल्यामुळे ते निवडणूक प्रक्रियेत सहभागी होण्याइतपत वेळ नसल्यामुळे निवडणुका स्वतंत्रपणे लढवू नयेत वा युतीही करू नये निवडणुकीत वेळ खर्च करून पराभव स्वीकारण्यापेक्षा पक्ष बांधणीसाठी वेळेचा सदुपयोग करू या. "[४८]

बाळासाहेब आंबेडकर यांनी १९९० च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत निवडणूक लढवण्यापेक्षा पक्ष मजबूत करण्यासाठी सर्व नेतृत्वांनी संघटनात्मक बांधणीसाठी वेळ द्यावा अशी भूमिका मांडली. बाळासाहेब आंबेडकर यांचा विचार हा सर्व तयारीने पक्ष निवडणुकीत उतरावा असा होता. पण अन्य दलित राजकीय नेतृत्व आपले राजकीय हितसंबंध सुरक्षित ठेवण्यात धन्यता मानत होते. यातून बाळासाहेब आंबेडकर, रा.सु. गवई कवाडे, रामदास आठवले यांचा निवडणूक आणि युतीबाबत परस्पर विरोधी भूमिका असल्यामुळे ऐक्य हे भंगले.

१९९० च्या निवडणुकीत पाठींबा कुणाला द्यायचा यासाठी मतदान घेण्यात आले. त्यात ३० पैकी १५ मते काँग्रेसच्या बाजूने व १४ मते जनता दलाच्या बाजूला पडली. एक मत तटस्थ होते. जनता दलाला पाटींबा देण्याच्या प्रस्तावावर स्वाक्षरी करा असे रामदास आठवले यांना सांगण्यात आले. स्वाक्षरी पुन्हा करतो असे सांगून निघून गेले. रा.सु. गवई यांनी जनता दलाच्या बाजूने मतदान करून काँग्रेसशी युती कशी होईल यासाठी राजकीय डावपेच आखत होते. या डावपेचात रा.सु. गवई यांची काँग्रेसनिष्ठा पुढे आली रामदास आठवले आणि रा.सु. गवई यांनी काँग्रेस पक्षाला पाठींबा जाहिर केला.

रा.सु. गवई आणि रामदास आठवले काँग्रेसच्या बाजूने गेल्याने बाळासाहेब आंबेडकर यांनी विश्वनाथ प्रताप सिंगाच्या जनता दलाशी युती केली. रामदास आठवले यांनी काँग्रेस सोबत युती केल्याने शरद पवार यांनी त्यांना महाराष्ट्राचे समाजकल्याण मंत्री केले तर जनता दलाशी बाळासाहेब आंबेडकर यांनी युती केल्यामुळे बाळासाहेब आंबेडकर यांना जनता दल सरकारने राज्य सभेवर घेतले. दलित राजकीय नेत्यांनी पक्षाला एकसंघ करून संघटनात्मक बांधणी करून पक्षाचा प्रभाव वाढवण्याऐवजी आपले राजकीय हितसंबंध सुरक्षित ठेवण्याकडे जास्त कल दिसून येतो. रिपब्लीकन ऐक्याच्या अपयशाबाबत ज.वि. पवार म्हणाले, "ऐक्याचा सामान्य माणसाच्या उत्कर्षांशी

काहीही संबंध नव्हता. संबंध होता तो नेत्यांच्या आमदारकी, खासदारकी, खुर्च्याशी, आणि सत्ता स्थानाशी, ऐक्य अडविण्याचा आणि फोडण्याचा ठेका काँग्रेसने घेतल्यामुळे काँग्रेसला पाठींबा देणारे आठवले हे या विघटनाच्या गुन्ह्याला जबाबदार आहेत. आठवले एकटेच गुन्हेगार नव्हते तर रा.सु. गवई, बाळासाहेब आंबेडकर हे सगळेच जबाबदार आहेत."[४९]

१९८९ च्या ऐक्यात दलित नेते हे मनाने विचाराने नाही तर शरीराने एकत्र आले होते. समाजाला फसवण्यासाठी समाजासमोर ऐक्याचा फसवा प्रयोग करीत होते. ऐक्याची प्रक्रिया करीत असतांना आपले राजकीय हितसंबंध कसे सुरक्षित राहतील याकडे सर्वांचे लक्ष होते. यावरुन दलित राजकीय नेत्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय विचारांकडे दुर्लक्ष करून सत्ता संबंध व राजकीय व्यवहारास प्राधान्य दिल्याचे दिसून येते. बाळासाहेब आंबेडकर यांनी १९८५ आणि १९८९ चे ऐक्य अनुभवले होते. १९८९ च्या ऐक्याबाबत बाळासाहेब आंबेडकर म्हणतात, "१९८९ च्या ऐक्याच्या संदर्भ देऊन एक शंकेचं वातावरण निर्माण करतात. भाजप सेनेची ताकद वाढत होती. यात दुमत नाही, परंतु त्यांची ताकद वाढविण्यामध्ये वसंतदादा पाटील आणि शरद पवार यांचेच हात होते. ज्यांनी सेनेला वाढविले तेच काँग्रेसवाले सेनेला रोखू शकतील यावर माझा विश्वास नव्हता. मतदान सुधारणामुळे मतदानांची टक्केवारी वाढली होती. हे वाढीव मतदान काँग्रेसकडे जात नव्हते तर इतरांकडे जात होते. त्यामुळे काँग्रेस-सेना-भाजपासारख्या धर्मांध शक्तीला थांबवू शकेल असे काही दिसत नव्हते. म्हणून मी मागील वेळी काँग्रेस सोबत जाण्यास नकार दिला."[५०]

बाळासाहेब आंबेडकर यांनी १९९० मध्ये महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत काँग्रेस बरोबर जाण्याऐवजी बौध्द धर्मियांच्या सामाजिक हितसंबंध जोपासणाऱ्या जनता दलासोबत गेले. जनता दलाच्या विश्वनाथ प्रतापसिंगांनी बौध्द धर्मियांचे हितसंबंध जोपासणारे महत्त्वपूर्ण निर्णय घेतले होते. बाळासाहेब आंबेडकर यांना दिनांक ०३/

०२/२०१३ रोजी लोकसत्ता आयडिया एक्सचेंज कार्यक्रमात रिपब्लीकन ऐक्याबाबत प्रसाद मोकाशी यांनी प्रश्न केला होता, "तुम्ही रिपब्लीकन ऐक्याच्या आड येता अशी टीका होते ? या प्रश्नाचे उत्तर देतांना बाळासाहेब म्हणाले, मी रिपब्लीकन ऐक्याचा कधीच प्रयोग केला नाही. इतर काही जणांनी केला असे म्हणाले"[५१] बाळासाहेब आंबेडकर यांनी १९८५ आणि १९८९ चे रिपब्लीकन ऐक्य अनुभवले होते. त्यामुळे त्यानंतर त्यांनी दलित नेत्यांनी एकत्र यावे किंवा ऐक्य व्हावे यासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. बाळासाहेब आंबेडकर यांच्या मते रिपब्लीकन ऐक्य हे राजकीय नाटकच आहे. म्हणून बाळासाहेब आंबेडकर यांनी ऐक्यासाठी प्रयत्न न करता त्यांनी बहुजन समाजाला एकत्र करून बहुजन समाजाचे राजकारण केले आहे. १९९० च्या विधानसभा निवडणुकीत सर्व दलित नेत्यांनी काँग्रेस ऐवजी जनता दलाबरोबर युती केली असती तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतील प्रभावी विरोधी पक्ष म्हणून आम्ही पुढे आलो असतो. अशी बाळासाहेब आंबेडकर यांची भूमिका होती.

सारांश रुपाने एक अभ्यासक म्हणून दलित नेतृत्वाविषयी आणि चळवळीविषयी शेवटी एकच निष्कर्ष हाती लागतो. तो म्हणजे दलित नेतृत्वाला सामाजिक भान राहिलेले नाही. स्वत:च्या पद लालसेने, स्वार्थामुळे यांना एक व्हायचे नाही. कसा का असेना समाजाबद्दलचा कळवळा आहे. पण हेच काम एकत्र येऊन सत्ता हस्तगत करुनही करता आले असते, पण प्रत्येकाच्या मनातील न्यूनगंड आणि प्रसिध्दीमुळे अंगी आलेला अहंभाव याला कारणीभूत असावा असे संशोधक म्हणून मला वाटते.

# संदर्भ सूची


१. अकोलकर प्रकाश, जेष्ठ राजकीय विश्लेषक, सकाळ सप्तरंग मधील सत्तेचा डबल गेम हा लेख दिनांक २९ मे, २०११.

२. देशमुख माई, झुंजार लोकनेता रामदास आठवले, माध्यम प्रकाशन, औरंगाबाद. पृ. ५७.

३. मनोहर यशवंत, रिपब्लीकन पक्ष बांधणीची दिशा, युगसाक्षी बाळासाहेब नागपूर, पृ. ३९.

४. पूर्वोक्त, पृ.५२.

५. कांबळे मधु यांचा लोकसत्ता मधील दिनांक १३ ऑक्टोबर २०११, पृ. ०३

६. पूर्वोक्त, पृ.०३

७. देशमुख माई, झुंजार लोकनेता रामदास आठवले, माध्यम प्रकाशन, औरंगाबाद, पृ.१२.

८. पूर्वोक्त, पृ.१४.

९. लिंबाळे शरणकुमार, रिपब्लीकन पक्ष वास्तव आणि वाटचाल, दिलीपराज प्रकाशन, पुणे, पृ. ३१३.

१०. मनोहर यशवंत, रिपब्लीकन पक्ष बांधणीची एक दिशा, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, पृ.३७-३८.

११. जोंधळे बी.व्ही. यांचा दै. लोकमत मधील लेख दिनांक ०३ ऑक्टोबर २०१२,

१२. गांजरे मा.फ., डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे, खंड ५, पृ.१३९.

१३. जोंधळे बी.व्ही., दै. लोकमत मधील लेख दिनांक ०३ ऑक्टोबर २०१२, रिपब्लीकनला हवा आंबेडकरवादी नेता.

१४. Max Well John C. , Leadership, Jaico Publishing House, Delhi, p.93.

१५. पवार प्रकाश, भारतीय राजकारण आणि नेतृत्वाची वाटचाल राजकीय धुरीणत्व-वर्चस्व, डायमंड प्रकाशन, पुणे, पृ.१८.

१६. पळशीकर सुहास, तक्ता क्र. ३ वरुन असे निदर्शनास येते की, कुलकर्णी सुहास, महाराष्ट्रातील सत्ता संघर्ष राजकीय पक्षाची वाटचाल, समकालीन प्रकाशन, पुणे. पृ. १९१.

१७. मनोहर यशवंत, रिपब्लीकन पक्ष बांधणीची एकदिशा युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, पृ.३८.

१८. मनोहर यशवंत, रिपब्लीकन पक्ष बांधणीची एक दिशा, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, पृ. ६-७.

१९. निकोसे माणिक एस., आंबेडकरी विचारधारेचा राजकीय पक्ष रिपाई की बसपा ?, पृ. ३१.

२०. क्षीरसागर रा.का., भारतीय रिपब्लीकन पक्ष, कैलास प्रकाशन, औरंगाबाद, पृ. ९३.

२१. पूर्वोक्त, पृ. ११९.

२२. कित्ता, पृ.१५२.

२३. कित्ता, पृ. १५३.

२४. कित्ता, पृ. १५३.

२५. डांगळे अर्जुन, ॲड. बाळासाहेब आंबेडकरांचे नेतृत्व आंबेडकरी चळवळीचे तिसरे पर्व प्रबुध्द भारत पाक्षिक दि. २८ ऑक्टोबर १९८८, पृ. १३.

२६. www.bharipbhaujan mahasang.com.

२७. भोजने भास्कर , अष्ठपैलू नेतृत्व बाळासाहेब आंबेडकर, पृ. ५८.

२८. पूर्वोक्त, पृ. ५२.

२९. www.bharipbhaujan mahasang.com.

३०. खंडागळे रत्नाकर ( संपादक ), विचार चळवळीचे बाळासाहेब आंबेडकर, कौशल प्रकाशन, औरंगाबाद, पृ. ०८.

३१. सोनूले राजेश ( संपादक ), बाबासाहेब ते बाळासाहेब, मुलाखत एक दृष्टिक्षेप, पृ. २१.

३२. खंडागळे रत्नाकर ( संपादक ), विचार चळवळीचे बाळासाहेब आंबेडकर, कौशल प्रकाशन, औरंगाबाद, पृ.१८.

३३. पूर्वोक्त, पृ.३०-३१.

३४. बाळासाहेब आंबेडकर समकालीन राजकारण बहुजन दृष्टीकोन क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले प्रकाशन, नाशिक, पृ. १८-१९.

३५. पळशीकर सुहास (संपादक), कुलकर्णी सुहास, महाराष्ट्रातील सत्ता संघर्ष राजकीय पक्षाची वाटचाल, समकालीन प्रकाशन, पुणे, पृ.९१

३६. गजभिये गजानन, भारतीय रिपब्लीकन पक्ष बहुजन महासंघाची भूमिका आणि राजकारण, वेद मुद्रा प्रकाशन, अमरावती, पृ. २७०.

३७. www.eci.in

३८. General Election of legislative Assembly of Maharashtra 1999, Chief electoral officer maharashtra, Mumbai, p.26.

३९. Ibid.

४०. दै. सकाळ, दिनांक २० ऑक्टोबर २०१४, पृ. ११.

४१. www.bharipbhaujan mahasang.com.

४२. सोनूले राजेश (संपादक), बाबासाहेब ते बाळासाहेब जयंती विशेषांक, पृ.१६.

४३. पवार प्रकाश यांचा दैनिक सकाळमधील दिनांक १५/१२/२०१३ रोजीचा हा लेख या नेतृत्वाची कोंडी का ?

४४. पवार ज.वि., रिपब्लीकन ऐक्यांची शोकांतिका, अस्मिता कम्युनिकेशन, मुंबई, पृ.२०.

४५. गजभिये भिमराव, पोस्टमार्टम ऑफ आर.पी.आय., संयमी प्रकाशन, नागपूर, पृ.५६.

४६. पूर्वोक्त, पृ.५६.

४७. कित्ता, पृ.५९.

४८ कित्ता, पृ.६१.

४९. पवार ज.वि. पवार, ऐक्याची शोकांतिका, अस्मिता कम्युनिकेशन, मुंबई, पृ.९८

५०. दै. लोकसत्ता, दिनांक ०३/०२/२०१३ रोजी प्रकाशित झालेली बाळासाहेब आंबेडकर यांची मुलाखत.

५१. पूर्वोक्त.